साधारणपणे शारीरिक अवयवाच्या विकासासाठी आवश्यक आहार न मिळणे म्हणजे कुपोषण मानले जाते. पुरेशा व योग्य आहार न मिळाल्यामुळे अशक्तपणाची परिस्थिती निर्माण होते. व्यक्तींच्या आवश्यक हालचाली नियंत्रित होतात. व्यक्तीचा शारीरिक विकास खुंटतो. कुपोषण म्हणजे आजार नव्हे परंतू अयोग्य आहार, उपासमार व जीवनसत्वांचा अभाव यांचा परिणाम मुलांच्या शरीरावर होतो. असे मुल अशक्त दिसू लागते. उदा. अंगावर सुज येणे, मुल रडके होणे, बाळाची वाढ खुटणे, वजन व उंची वयाच्या प्रमाणात न वाढणे यालाच कुपोषण म्हटल्या जाते.

अतिरिक्त आहाराचा परिणामही शरीरावर होतो, वजन व वय यांच्यामध्ये तफावत निर्माण होते, म्हणजेच अतिरिक्त, अनावश्यक आहाराच्या परिणामातूनही कुपोषणाची समस्या उद्‌भऊ शकते, मात्र भारतामध्ये अन्नाची कमतरता म्हणजेच कुपोषण असा कुपोषणाचा अर्थ प्रचलित आहे. थोडक्यात कुपोषण म्हणजे अन्न घटकांची उणिव, पोषक अथवा जीवनसत्व युक्त आहाराची कमरता अथवा सकस आहाराअभावी निर्माण झालेले शारीरिक वैगूण्ये होय.

कुपोषणाचे सर्वांगावर सूज व रोडपणा हे दोन मुख्य प्रकार आढळतात. दोनही प्रकारचा सबंध हा आहाराशी आहे. गर्भ पुर्वावस्था, गर्भावस्था तसेच जन्मानंतरही आहाराचा शारीरिक विकासाशी सबंध असतो. मातेची शारीरिक व मानसिक परिपक्वता नसेल, तसेच गर्भावस्थेत मातेला सकस आहार मिळत नसेल तर अशी अपत्ये जन्मतः कुपोषित असू शकतात. म्हणून दीर्घकाळपर्यंत अयोग्य आहार व उपासमार अपुरे अन्न यांचा परिणाम मुलांवर होत असतो. असे मुल एखाद्या लहानशा आजाराने सुध्दा अचानक कुपोषित दिसू लागते.

कुपोषणाची समस्या बालक, मुले, तरुण वय, प्रोढक्य तसेच वृध्दत्वामध्ये आढळते. परंतु बहूंतांशी कुपोषण हे बालवयातच निर्माण झालेले असते. वयाच्या १८ ते २० वर्षापर्यंत वजन उंची, आणि स्थायुभार वाढत राहतो. या काळात म्हणजेच २० वर्षापर्यंत कुपोषित असेल तर त्यांना आयुष्यभर शारीरिक व्याधींना सामोरे जावे लागते. आणि म्हणून कुपोषणावर वेळीच प्रतिबंध करण्यासाठी मातेची काळजी, गर्भातील बाळाची काळजी तसेच बालवयातील बालकांच्या आहार व आरोग्याची काळजी घेणे महत्वाचे ठरते.

**बालकुपोषण समस्या आणि उपाय :-**

पोषक तत्व युक्त आहारा अभावी बालकांचा खुरटलेला शारीरिक विकास अथवा वजन व उंची यामधील तफावत म्हणजे बालकुपोषण होय. बालवयातील कुपोषणावर उपचाराची मात्रा विशेष लागू पडत नाही तसेच त्यावर उपचार करतांना मर्यादा येतात. त्यामुळे बालकांना आपल्या पुढील आयुष्यातही विविध प्रकारच्या शारीरिक व मानसिक आजारांचा सामना करावा लागतो. कुपोषित बालकांची समस्या ही राष्ट्रीय ध्येय धोरणावर विपरित परिणाम करणारी समस्या ठरते. गुणात्मक लोकसंख्या वृध्दीवर त्याचा परिणाम जाणवतो. जन्म मृत्यू या लोकसंख्यात्मक चलावर कुपोषणाचा प्रभाव पडतो व राष्ट्रीय प्रगतीच्या मार्गामध्ये कुपोषणाची समस्या अडसर बनते.

भारतातील जवळपास सर्वच राज्यात कुपोषित बालके आढळून येतात आदिवासी प्रवण भागात कुपोषित बालकांची संख्या सर्वाधिक आढळते. युनिसेफ च्या अहवालानुसार भारतात पाच वर्षाखालील १० हजार बालके दरवर्षी कुपोषणामुळे मृत्युमुखी पडतात[४] भारतातील बालमृत्युचा दर हा जगात सर्वाधिक असून किमान ३०% मुले ही कमी वजनाची असतात. पाच वर्षाखालील अर्धा टक्का मुले अतिकुपोषित आणि सुमारे ४० टक्के कुपोषणाच्या सीमारेषेवर आहे.[५]

भारतामध्ये राष्ट्रीय आरोग्य संस्थेच्या (NHS) सर्वेक्षणानुसार वयानुसर अल्पवजनी मुलांचे प्रमाण ४६%, वयानुसार उंची खुरटलेली मुले ३८% व उंची नुसार वजन कमी असणे, १९% तर

महाराष्ट्रात वयानुसार अल्पवजनी मुलांचे प्रमाण ४०% ,वयानुसार उंची नसलेली मुले ३८%, तर उंची नुसार वजन कमी असणारी १५% मुले आढळून आली. ६ ते ३५ महिने वयोगटातील रक्त कमी असलेल्या मुलांचे प्रमाण ७९% तर स्त्रियांमध्ये ५६% इतके आहे.

**कुपोषित बालकांची लक्षणे:-**

१) १ ते ५ वर्षाखालील १३.५ से.मी पेक्षा कमी दंडघेर असणारी बालके कुपोषित वर्गवारीमध्ये मोडतात.

**२)** वयानुसार उंची नसणे, वाढ खुरटणे. अपेक्षित उंचीसाठी वयानुसार काही ठोकताळे आहेत. जन्मावेळी ५० से.मी. सहा महिन्याच्या शेवटी ६५ से.मी., वर्षा अखेर ९५ सेमी आणि चार वर्षाच्या शेवटी १०० से.मी. उंची योग्य आहे. मात्र वयानुसार उंचीमध्ये खुपच तफावत असेलतर अशी बालके कुपोषित ठरतात.

**३)** वयानुसार कमी वजनाची किंवा अतिरिक्त वजनाची बालके कुपोषित असतात. साधारणतः जन्मावेळी ३ किलो, सहाव्या महिन्याअखेर ६ किलो, वर्षाअखेर १२ कि.लो. तिसऱ्या वर्षाअखेर १४ किलो तर चौथ्या वर्षाअखेर १६ किलो वजन योग्य समजले जाते.

**४)** डोक्याचा घेर अपेक्षित नसेल तर बालक कुपोषित वर्गवारीमध्ये मोडते. जन्मावेळी डोक्याचा घेर ३४ से.मी., सहाव्या महिन्याअखेर ४२, वर्षाच्या शेवटी ४५, दुसऱ्या वर्षाशेवटी ४७, तिसऱ्या वर्षाअखेर ४९ व चौथ्या वर्षाअखेर ५० से.मी. अपेक्षित आहे.

५) शरीरात रक्ताचे प्रमाण १२ ग्रॅमच्या वर असावे. भारतामध्ये लहान मुलांमध्ये तसेच स्त्रियांमध्ये रक्ताचे प्रमाण कमी आढळते.

उपरोक्त पध्दतीने कुपोषित बालकांचे निदान केल्या जाते. वय, वजन, उंची यांच्यामध्ये समतोल नसणारी मुले यांच्यावर उपचार करणे खुपच कठीण ठरते. त्यासाठी प्रतिबंधात्मक उपचार महत्वपुर्ण आहे.

**बालकुपोषणाची कारणे :-**

पोषण आहाराची कमरता हे बालकुपोषणाचे प्रमुख कारण ठरते. मात्र त्यासाठी कुटूंबाची आर्थिक आणि सामाजिक पार्श्वभूमीही विचारात घेणे आवश्यक आहे. मातेचा आहार, आरोग्य या बरोबरच मातेची शरीरिक व मानसिक परिपक्वताही बालकांच्या निकोप वाढीसाठी महत्वपूर्ण आहे.

**१) मातेसंबंधित घटक :-**

बालविकास अथवा बालकुपोषण यामध्ये मातेची भूमिका अनन्य साधारण आहे. माता निरोगी असेल तर तिच्या पोटी जन्माला येणारे बाळ निश्चितच निरोगी असते. मात्र माताच कुपोषित असेल तर बाळावर त्याचा परिणाम होतो. भारतामध्ये पितृसत्ताक कुटूंबपध्दतीच्या प्रभावामुळे स्त्रींचे आरोग्य व आहार याकडे दुर्लक्ष केल्या जाते. त्यामुळे भारतातील स्त्रियांमध्ये रक्ताची कमतरता आढळते. कमी वजनाचे बाळ जन्मण्यासाठी आईचे कमी वयातील लग्न व बाळंतपणे हे एक प्रमुख कारण आहे.

**२) सामाजिक घटक :-**

निरक्षरता, अज्ञान, अंधश्रध्दा यामुळे बालकांच्या विकासावर परिणाम होतो. चुकीचा आहार घेणे व बाळाला देणे, कुटूंबामध्ये मुल आणि मुली असा भेदभाव करणे, साध्या सुध्दा आजाराकडे दुर्लक्ष करुन त्यावर गंडा, दोरा, मंत्र इत्यादी पध्दतीने उपचार करणे यातून बालकुपोषणाला हातभार मिळतो.

**३) आर्थिक घटक :-**

सकस आहार, जीवनसत्वयुक्त आहार खरेदी करता येणे शक्य नसल्याकारणाने बालकुपोषण वाढीस लागते. रोजच्या रोजीचा प्रश्न असणारे कुटूंब, अर्थपोटी उपाशी राहणारे कूटूंब, शिळे, उष्टे अन्न खाऊन गुजरान करणारे कुटूंब भारतामध्ये आढळून येतात.

**४) आरोग्यविषयक घटक :-**

फुटपाथ, झोपडपटटी, दल दलीच्या वस्त्यांमध्ये राहणाऱ्या कुंटूबात आरोग्याची हेळसाaड झालेली असते. घरात व परिसरात अस्वच्छता असल्यामुळे अनेक आजारांना निमंत्रण मिळते त्यामुळे बालकांमध्ये विविध प्रकारचे आजार निर्माण होतात व त्याचा परिणाम बालकुपोषणात होतो. जवळपास ३३% बालकांना आरोग्यविषयक सुविधा वेळेवर मिळत नसल्या कारणाने तेथे कुपोषणाचे प्रमाण अधिक आढळते.

**बालकुपोषणाचे परिणाम :-**

बालकुपोषणाचे बालक, कुटूंब, समाज व राष्ट्र यावर दुरगामी परिणाम होतात. बालकाचा शारीरिक मानसिक विकास खुंटतो, त्याचे व्यक्तिमत्व कोमोजले जाते. त्याला शरीरिक यातना सहन कराव्या लागतात. बालहट्ट आणि बालहक्क यापासून तो दुरावतो व प्रसंगी त्याला मृत्युला सामोरे जाण्याचा प्रसंग उदभऊ शकतो. कारण बालमृत्युदरांमध्ये कुपोषण हे एकमहत्वपूर्ण कारण आहे.

बालक ज्या कुटूंबाचा सदस्य आहे. त्या कुटूंबावर बालक अवलंबून असल्याकारणाने कुटूंबाचा बहुतांशी वेळ बालकांच्या आरोग्याकडे लक्ष देण्यात जातो. वेळोवेळी आहार आणि उपचार यासाठी त्यांना आर्थिक पुंजी खर्च करावी लागते. कुटूंब आर्थिक विवंचनेत सापडते. मुलांच्या बडबड गीताऐवजी त्याची किरकिर मनाला सुन्न करणारी ठरते. कुटूंब कायम चिंता, काळजी व तणावात जीवन जगते.

कुपोषित बालकांची संख्या वाढल्यास अवलंबित्वाचे प्रमाण वाढते. त्यामुळे राष्ट्राला आरोग्यविषयक कार्यक्रमावर भर द्यावा लागतो. आहार आरोग्य उपचार या अनुषंगाने विशेष आर्थिक तरतुदी कराव्या लागतात. निरोगी नागरिक राष्ट्राचा आधार स्तंभ असतो मात्र कुपोषितांमुळे याला तडा जातो राष्ट्राचा मानवविकास निर्देशांक ढासळतो.

**बालकुपोषणावरील उपाय :-**

**१) दारिद्रय निर्मुलन :-**

गरीबी हेच कुपोषणाचे प्रमुख कारण आहे. भारतामध्ये ३८% लोक दारिद्रयरेषेखाली जीवन जगतात. कुटूंबामध्ये आर्थिक चण-चण असल्याकारणाने शारीरिक विकासासाठी आवश्यक तो आहार मिळत नाही. परिणामी कुपोषण निर्माण होते. त्यामुळे कुपोषणाच्या समस्येच्या निर्मूलनासाठी दारिद्रय निर्मूलन अत्यावश्यक ठरते.

**२) आरोग्य जागृती व सुविधा :-**

आरोग्य जागृती व आरोग्याच्या सुविधा मिळाल्यास कुपोषणाची समस्या नियंत्रित करता येऊ शकते. कुपोषणाच्या सीमेवर असणाऱ्या मुलांवर योग्य वेळी उपचार केल्यास अशी बालके कुपोषणा पासून वाचविता येऊ शकतात. माता व कुटूंबाला योग्य वेळी आहारा विषयीचे माहिती व महत्व पटवून दिल्यास बालकांचे पोषण उत्तम होऊ शकते.

**३) स्वच्छता :-**

अस्वच्छता हे संपूर्ण रोगांचे महत्वपुर्ण कारण आहे. त्यास कुपोषणही अपवाद नाही. अन्नाची स्वच्छता, परिसर स्वच्छता, बाळ अथवा बालकांच्या मातेची स्वच्छता, कपडे, पाण्याचा वापर इत्यादी बाबींची विशेष काळजी घेतल्यास कुपोषणावर प्रतिबंध करता शकतो.

**४) मातेसबंधित उपचार :-**

बालकुपोषणात मातेची भूमिका महत्वपूर्ण आहे. मातेने गर्भपूर्व अवस्थेमध्ये तसेच बाळ गर्भात असतांनी व जन्मल्यानंतर स्वतःची व बाळाच्या योग्य काळजी घ्यावी. स्वतःच्या व त्याच्या आहारावर विशेष लक्ष द्यावे. बाळाच्या वाढीसाठी जाणीवपुर्वक भर द्यावा. बाळ गर्भात असतांना किंवा जन्मल्यानंतर मातेने व्रतवैकल्य, उपास - तापासाऐवजी सकस पोष्टिक आहारावर भर द्यावा.

**५) बालकांसाठी सकस आहार पुरविणे.**

सहा महिन्यानंतर बालकांना पुरक आहाराची नितांत आवश्यकता असते. वरण, शेंगदाने, गुळ, तुप, दुध, पातळ अन्न, भात व भाज्याची पेज, इत्यादी आहारावर भर द्यावा. कुटूंबाला हा आहार देणे शक्य नसल्यास अंगणवाडीच्या माध्यमातून मुलांना पुरविण्यात यावा. अंगणवाडी ताईने अशा बालकांच्या आहारावर लक्ष द्यावे तसेच बालक आहार घेण्यास नकार देत असेल तर बालतज्ञ डॉक्टरचा सल्ला द्यावा. तेल, तुप व जीवनसत्वयुक्त आहार बालकास दिल्यास त्याचा परिणाम बालकांच्या सुदृढ वाढीवर होतो.

**निष्कर्ष :-**

१) भारतातील बालकुपोषणाची समस्या आर्थिक व सामाजिक घटकांशी निगडित आहे. अज्ञान, अंधश्रध्दा, निरक्षरता, बालविवाह, गरीबी इत्यादी घटक कुपोषण समस्येचे वाहक आहेत.

२) भारतामध्ये दारिद्र्यरेषेखालील कुटूंबात बालकुपोषणाचे प्रमाण अधिक आहे. विशेषतः आदिवासी आणि दलित कुटूंबामध्ये हे प्रमाण अधिक आढळते. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात व बालकुपोषण अधिक प्रमाणात आढळते.

३) बालकुपोषणमुळे मानव विकास निर्देशांक गुणात्मक पातळीवर घसरतो. बालकुपोषणामुळे बालमृत्यु दरामध्ये वाढ संभवते. बालकुपोषण राष्ट्रीय विकास वृध्दीला मारक ठरते.

४) बालकुपोषणामुळे व्यक्ती, कुटूंब व राष्ट्राला विविध प्रकारच्या समस्यांचा सामना करावा लागतो. बालकुपोषणाच्या प्रतिबंधनासाठी शासनाला शासकीय पातळीवर विविध योजनांची अंमलबजावणी तातडीने हाती घ्यावी लागते.

५) बालकुपोषणाच्या प्रतिबंधनासाठी कुटूंबाची आर्थिक उन्नती व जागृती करणे आवश्यक ठरते.

६) भारतात राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, ओरिसा, बिहार व महाराष्ट्र ही सहा राज्यांमध्ये कुपोषणाचे प्रमाण अधिक आढळते.

७) मनुष्यबळ व क्रयशक्तीच्या दृष्टीकोनातून बालकुपोषण खुप हानिकारक आहे. कुपोषणामुळे शारीरिक अवयाचा विकास खुंटतो, बुध्याक विकसित होत नाही त्यामुळे लोकसंख्येवर अंवलबित्वाचे प्रमाण वाढते.

८) जगामध्ये आफ्रिकन देश कुपोषणग्रस्त म्हणून प्रसिध्द आहेत. पण भारतीय कुपोषणाची तीव्रता त्यापेक्षा भयानक असल्याचे जागतिक पोषणविषयक आकडेवारीवरुन निदर्शनास येते.

९) तीन वर्ष वयोगटातील बालकांचे कुपोषण गैर समजूती, संसर्ग व आरोग्यसेवा नसल्याने वाढते. आहार कमतरता हे त्यामागील प्रमुख कारण नाही. सद्यकाळात गरीब कुटूंबात देखील सहसा एवढी अन्नटंचाई नसते.

१०) भारतातील कुपोषण निर्मुलनाच्या अनुषंगाने शासकीय व निमशासकीय पातळीवरुन विविध कार्यक्रम व योजना आस्तित्वात आल्या. गाव, शहर व वस्ती पाडे या ठिकाणी कुपोषण प्रतिबंधानासाठीचे कार्ये चालू आहे. मात्र ते पुरेशे नसल्याकारणाने त्याचा फारसा फायदा होतांना दिसत नाही. त्यासाठी शासनाने उपचारात्मक कार्यक्रमाबरोबरच प्रतिबंधात्मक कार्यक्रमावर विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक बनले आहे.

**संदर्भ :-**


1- Planning commission, Gov. New Delhi 12 th five year plan-2012-17 volume II social sector (2008) oxford university press new Delhi.
2- Registrar General and census commissioner, India, ministry of Home affairs government of India new Delhi census 2001 & census 2011.
3- Sengupta, Arjun, (2009), Report of the National commission for Enterprises in the unorganized sector.
4- अष्टेकर शाम आणि अष्टेकर रत्ना, आरोग्य विद्या, www.arogyavidya net.in
5- अष्टेकर, शाम- बालकुपोषण- पुढची आव्हाने www.loksatta.com
6- www.motherchildnutrition.org .in
7- www.unicef.org.nutrition
8- www.incbi.inm.nih.gov. protein energy malnutrition in india.
9- www.hsj.gr.madicine child malnutrition and gender preferences in india .

 ISSN -2349-3984

# बालकांच्या समस्या आणि आव्हाने

**प्रा.रावसाहेब शंकरराव ठोके**
सहयोगी प्राध्यापक,
श्रीमती पि.डी. पाटील समाजकार्य महाविद्यालय,
**खडकी अकोला**

**प्रस्तावना**

लेकुराचे हि जाणे माऊलीचे चित्त
ऐसी कळवळयाची जाती करी लभावीण प्रीती
पोटी भार वाहे त्याचे सर्वस्वही स्वाहे

तुकाराम महाराजांचे उपरोक्त वचन बालकांच्या हितासबंधी आईची जागरूकता स्पष्ट करणारे आहे. बालकांचे महत्व आई ऐवढेच देशाला आणि समाजाला सुदधा आहे. स्वतंत्र भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू बालकांचे अत्यंत आवडते व्यक्तिमत्व त्यामुळे पंडित नेहरू बालकांना देशाचे आधारस्तंभ म्हणून नेहमीच आपल्या भाषणात उल्लेखीत करीत होते. कदचित तेव्हाची परिस्थिती बालकांना पोषक असावी. परंतु आज आपली भारतीय जनता अनेक समस्यांनी जर्जर झालेली दिसते. यातूनच बालकांच्या समस्या डोके वर काढत आहेत. व्यक्तिला बालावस्था मध्ये अधिक प्रेम, काळजी आणि संरक्षण या बाबींची गरज असते. या आधारावरच त्यांच्या जीवनाचा सर्वागिण विकास अवलंबून असतो. अब्राहम लिंकन यांच्या मतानुसार, लहान मुल हे असे एक साधन आहे की, जे एखाद्या व्यक्तीद्वारा प्रारंभ केलेल्या कार्याला पूर्ण करण्याचे कार्य करते. भारताचा प्रत्येक बालक भारताचा भावी नागरीक आहे. प्रत्येक कुटुंबातील बालकाला पोषक वातावरण मिळेलच असे नाही. जन्माला येण्यापूर्वी पासुन त्याचे संगोपन चांगलेच होईल असे नाही. त्यासाठी त्या कुटुंबाची आर्थीक, सामाजीक, शैक्षणीक इत्यादी बाजू देखील परिणामकारक ठरतात. राष्ट्रातील मुले ही राष्ट्रांची अत्यंत महत्वाची संपत्ती आहे. त्यांचे स्वास्थ्य ही आपली जबाबदारी आहे. मनुष्यबळाच्या विकासासाठी आखलेल्या योजनांमध्ये मुलांसाठी महत्वपूर्ण कार्यक्रमांना स्थान असले पाहिजे त्यामुळे शारीरिकदृष्ट्या समर्थ, मानसिकदृष्ट्या कुशाग्र, नैतिकदृष्ट्या सबळ असे सशक्त नागरिक बनतील आणि त्यांच्यात समाजाला जरुर असणारे कौशल्य आणि आत्मबळ निर्माण होईल. सर्व मुलांना विकासाची समान संधी मिळेल व समाजातील असमानता दूर करुन सामाजिक न्याय प्रस्तावित करता येईल.

म्हणजेच आजच्या बालकांमध्ये राष्ट्राचे हित उभे आहे. त्यांच्या विकासावरच देशाच्या विकासाची आधारशिला आहे. अशा या उद्याचे नागरी आणि आधारस्तंभ असणाऱ्या बालकांची काळजी घेणे तसेच त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे याबाबींचा उहापोह प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये**

- बालविकासाचा अर्थ अभ्यासणे.
- बालकांच्या समस्या अभ्यासणे.
- बालकांच्या समस्या सोडविण्यासाठी उपाय सुचविणे.

**अभ्यासपध्दती**

शोध निबंध हा संशोधनाचा एक भाग असतो. ज्याप्रमाणे संशोधनातून संशोधक हा एखाद्या समस्येचे सुत्रण करतो आणि निष्कर्षाप्रत पोहचतो. त्याचप्रमाणे शोधनिबंधात देखील एखादी समस्या निश्चित करून त्या समस्येची कारणमिमांसा केली जाते. आणि समस्येच्या सोडवणूकीसाठी शिफारशी सुचविण्यात येतात. तसेच संशोधनाप्रमाणे शोधनिबंधासाठी सुध्दा तथ्ये संकलित करण्याची

गरज पडते. तथ्य संकलन म्हणजे अध्ययन विषयाच्या सखोल अभ्यासासाठी अध्ययन सामग्री गोळा करणे होय. हे तथ्य संकलन प्रामुख्याने दोन प्रकारे करण्यात येते. ते म्हणजे

**तथ्य संकलन**

प्राथमिक तथ्यसंकलना अंतर्गत गोळा करण्यात येणारी तथ्ये ही प्रामुख्याने निरिक्षण, प्रश्नावली आणि मुलाखत अनूसूची यांच्या माध्यमाने गोळा केली जातात.

द्वितीय तथ्य संकलन हे शासकीय अहवाल, पुस्तके, मासिके, ग्रंथ इत्यादी प्रकाशित आणि अप्रकाशित ग्रंथाच्या माध्यमातून गोळा केली जातात.

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनासाठी प्रामुख्याने द्वितीयक तथ्यांचा आधार घेण्यात आला असून ही तथ्ये बालकांच्या समस्यांशी संबंधीत ग्रंथ आणि पुस्तके यांच्या माध्यमातून गोळा करण्यात आली आहेत.

**बालविकास :**

भारतवर्षामध्ये मुलांच्या महत्तेला समजण्यात आले आहे. तसेच राष्ट्रीय बाल नीति 1974 आणि अन्तर्राष्ट्रीय बाल वर्ष, 1979 मध्ये बनविण्यात आलेल्या राष्ट्रीय कार्य योजना मध्ये मुलांना राष्ट्राची सर्वात मोठी संपत्ती मानण्यात आले आहे.

राष्ट्रीय कार्य योजना अनुसार, ''राष्ट्रातील मुले ही राष्ट्राची संपत्ती आहेत. तसेच त्यांच्या भविष्यावर देशाचा विकास निर्भर आहे. लहान मुलांमध्ये गुंतवणूक करणे म्हणजे राष्ट्राच्या के भविष्य में विनियोजन करणे आहे. आज चा अरोग्यदायी बालक उद्याचा क्रियाशील आणि बुद्धिमान नागरिक आहे.

**रुसो यांच्या मते,**

बालकांची नैसर्गिक वाढ होण्यास कोणताही धोका नाही परंतु थोडया प्रौढ मार्गदर्शनाची आणि देखभालीची गरज असते.

समाजात आपले स्थान मिळविण्याकरिता आत्मसाधन आणि आत्मभिव्यक्ती हे बालकांचे हक्क आहेत. त्यामुळे या हक्कांपासून त्यांना वंचित ठेवणे हा त्यांच्यावरील अन्याय आहे. थोडक्यात बालकाला हवे ते करण्याचे म्हणजेच विधायक बाबी करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे.

**बलविकासशास्त्राचा अर्थ :**

जन्मपूर्व अवस्थेपासून पौंगडावस्थेत बालकाचा विकास सर्वांगीण विकास कसा होते हे शास्त्रीय पध्दतीने अभ्यासणारे शास्त्र म्हणजे बालविकासशास्त्र होय. बालविकासशास्त्र हे सामान्य, असामान्य, आणि अपसामान्य बालकाची वाढ आणि विकाससंबंधी अभ्यास करते. त्याचबरोबर बालविकसशास्त्रातून बालकाच्या विविध वर्तन आणि वर्तन आकार यासंबंधी शास्त्रीय माहिती मिळण्यास मदत होते. बालविकासशास्त्राचे सैध्दांनिक महत्व आहे. बालकाच्या आयुष्याची पहिली 12 वर्षे त्याच्या भावी आयुष्याच्या जडणघडणीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असतात हे बालविकासशास्त्राच्या अभ्यासामुळे कळण्यास मदत झाली आहे. बालविकासशास्त्र म्हणजे बालकाची शारीरिक, भावनिक, बौध्दिक आणि सामाजीक वाढ आणि विकास यासंबंधीचा शास्त्रशुध्द पध्दतने ज्यात अभ्यास केला जाते अशा शास्त्राला बालविकासशास्त्र म्हणतात. बाविकास ही एक गुंतागुंतीची सातत्याने चालणारी प्रदीर्घ प्रक्रिया आहे. या प्रक्रिया शारीरिक वाढ आणि विकासाशी संबंधीत आहेत. तसेच भावनिक, मानविक, बौध्दीक, सामाजीक विकासाशी निगडीत आहे. बालकाच्या विकासाचा अभ्यास करताना जन्मपूर्व अवस्थेपासून करावा लागतो. कारण गर्भधारणा होणेही देखील एक प्रक्रिया आहे. ज्याचा संबंध माता पित्याबरोबर आधिच्या वंशावळीशी जुळल्या जातो. जन्माला येणारे मुल म्हणजे गुणयूत्रांना मिळालेले नवीन मानवी स्वरूप होय. जन्मोत्तर काळात बालकाला वातावरणाशी समायोजन साधावे लागते. सुरूवातीचे एक वर्षापर्यंत बालक प्रामुख्याने मातेवरच अवलंबून असते.

भूक, झोप, तहान आणि शारिरिक सुरक्षितता या गरजा मातेच्या माध्यमातून पूर्ण होतांना दिसतात. त्याचवेळी भावनिक सुरक्षिततेचे मातेच्या ममत्त्वाने बालकाला प्राप्त होते. बालकांच्या सर्वांगिण आणि विकास तत्त्वाचे विश्लेषण बालविकासशास्त्रात केलेले आहे. वाढत्या वयाबरोबर शारिरीक अवयवांमध्ये परिपक्वता येते. तसचे बालकांच्या भावनिक, सामाजिक, बौध्दीक विकास घडून येतो. या विकासासंबंधीचा सर्वागिण अभ्यास बालविकासशास्त्रातून प्राप्त होतो.

**इ.बी.हरलॉक यांच्या मते,**

बालविकासात बालकाचे रुप, वर्तन, रुची, प्रवृत्ती यातील बदलाचा अभ्यास केला जातो. बालकाने एका विकासात्मक अवस्थेतून दूसऱ्या अवस्थेत पदार्पण करणे म्हणजे बालविकास होय.

सरोजीनी साव्हरशियन याच्या मते,

बालविकास गर्भधारणेपासून पौगंडावस्थेपर्यंत बालकाची वाढ आणि विकासाचा अभ्यास करणारी स्वतंत्र शाखा होय.

थोडक्यात बालविकास ही संकल्पना ही बालकांच्या जन्मपूर्व अवस्थेपासून चालणारी प्रक्रिया आहे जी त्यांच्या युवावस्थेपर्यंत चालत राहते.

**बालकांचे मानवी हक्क**

- जीवन जगण्याचा अधिकार
- योग्य शारिरिक व मानसिक विकासाच्या संधी
- कौटुंबीक व सामाजिक सुरक्षितता
- योग्य शिक्षणाच्या संधी
- आरोग्याच्या योग्य सुविधा
- मित्र व संवगडयासोबत खेळण्याचा अधिकार
- सकस व पोटभर आहाराची उपलब्धता
- राज्यघटनेने दिलेले सर्व अधिकारी
- माता पित्याकडे राहण्याचा अधिकार
- समाजाभिमुख युवक बनवण्यासाठी आवश्यक सर्व गोष्टी

**बालकांच्या समस्यांचे स्वरुप**

भारताची वाटचाल जागतिक महासत्तेकडे सुरू झाली आहे. असे राजकीय नेते, अर्थसल्लागार आणि कॉपररेरेट कंपण्या गेल्या काही वर्षापासून बोलू लागल्या आहेत. मुक्त आर्थिक धोरण स्विकारल्यानंतर भारताची आर्थिक पातळीवर मोठया प्रमाणावर प्रगती झाली आहे. हे खरे आहे. माहिती तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन क्षेत्राातील भारताची कामगीरी नेत्रदिपक आहे. मात्र या सगळया गोष्टी असंतांना भारताची सामाजिक पातळवरील घसरणही तितक्याच झपाटयाने होत आहे. विकास होत असतांना सामाजिक शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रात मात्र अत्यंत वाईट परिस्थिती आहे. गरिबी वाढती लोकसंख्या आणि भ्रष्टाचारामुळे सरकार व सामाजिक संस्थांना या क्षेत्रात यशस्वी होत आले नाही. बालहक्कांबाबतही भारताची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. भारतात बालहक्क कायदे आहेत आणि राष्ट्रीय बालहक्क आयोगही आहे. जोडीला आज भारतात बालकांच्या समस्या निवारण्यासाठी अनेक सामाजिक संस्था कार्यरत आहेत. मुलांचा निरागसपणा जपण्यासाठी अनेक प्रयत्न केले जात आहेत. परंतु गरिबी आणि अज्ञानामुळे हे षक्य होत नाही. गरीब, अनाथ आणि वंचित मुलांना बालमजुरी, बालगुन्हेगारी, बाललैगिग शोषणाला मोठया प्रमाणावर सामोरे जावे लागत आहे. या सगळयातून मलांना बाहेर काढण्याचे प्रयत्न सरकार आणि सामाजिक संस्था मिळून करत आहेत. परंतु त्यांचे प्रयत्न तोकडे पडत आहेत. नोबेल पारितोषीक विजेते सत्यार्थी यांनी मुलाांच्या एका वेगळयाच समस्येकडे बोट दाखविले असून ही समस्या मुलांच्या बेपत्ता होण्याची आहे. एकंदरीत मुलांच्या समस्येचे स्वरूप दिवसेंदिवस गंभीर रूप धारण करित आहे. यावर उपाय

होणे काळाची गरज आहे अन्यथा देशाचे भवितव्य अंधारात आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

**बालकांच्या मनावर परिणाम करणाऱ्या बाबी (समस्या)**

बालकांना उद्रभवणाऱ्या समस्यांचे साधारणपणे कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक तसेच आरोग्यविषयक असे वर्गीकरण करण्यात येते. त्यांचे सविस्तर विश्लेषण पुढीलप्रमाणे

**1. पालकांना असणारा वेळेचा अभाव**

आधुनिक काळात उदभवणारी ही सर्वात मोठी समस्या आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात आई आणि वडील आपल्या पाल्यांचा खर्च पूर्ण करण्यासाठी अर्थाजनाची कामे करतात. यातून ते आपल्या पाल्यांना पुरेसा वेळ देऊ शकत नाहीत. परिणामी दुसऱ्यांच्या सानिध्यात राहणारी मुले त्यांच्याकडे आकर्षित होतात. त्यातून ते अनावश्यक गोष्टीत लक्ष घालतात. तसेच पाळणाघरात राहणारी मुलांना पाळणाघरात जर योग्य वर्तणूक दिली जात नसेल तर तेथूनच त्यांच्या मनावर विपरीत परिणामांचे आक्रमण व्हायला सुरूवात होते.

**2. दारिद्रय**

आपल्या देशात दारिद्रय रेषेखाली जीवन जगणाऱ्यांची संख्या मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे बालकांना दारिद्रयाचा सामना करावा लागतो. त्यामुळे त्यांच्या इच्छा पूर्ण होत नाहीत. परिणामतः मुलांमध्ये बालमजुरी, चोरी अशा भावना बळकाविण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**3. अनाथपण**

काही दुर्दैवी मुलांचे बालपणीच कोणत्या न कोणत्या कारणामुळे आई वडीलांचे छत्र हिरावल्या जाते. आणि त्यामुळे त्यांच्यावर अनाथ होण्याची पाळी येते. कुटुंबातील नातेवाईक या मुलांची जबाबदारी घेतातच असे नाही. ती मुले शेवटी निराधार बनतात. परिणामी त्यांना अकाली मोठेपण येते. किंवा अनाथ आश्रम, बालसुधार गृहे अशा ठिकाणी मन मारुन रहावे लागते. आपल्याला आपल्याच नातेवाईकांनी न केलेली मदत, अकाली आलेले अनाथपण तसेच मोठेपण यामुळे हे मुले इतरांषी सहजपणे जुळायला तयार होत नाहीत. किंवा त्यांच्या भावी जीवनात ते इतरांशी संबंध ठेवणे टाळतात.

**4. कुटुंबाचे विघटन**

आई वडीलांमध्ये बेबनाव झाल्यामुळे कुटुंबाचे होणारे विघटन हे देखील बालकांच्या मनावर परिणाम करणारे ठरते. कौटुंबीक वादातून किंवा इतर वादातून जर घटस्फोट घेतल्या गेला तर त्यांचा सर्वाधिक फटका हा लहान मुलांना बसत असतो. घटस्फोट घेतल्यामुळे कधी कधी मुलांची जबाबदारी आई वडील दोघेही घेत नाहीत. किंवा जर आई किंवा वडील यांच्यापैकी एकाने ही जबाबदारी घेतलीच तर त्यांची होणारी होरपळ ही मुले जवळून पाहतात. प्रसंगी त्यांच्या मनात आपल्या जोडीदाराविषयी संभ्रम होण्याची दाट शक्यता असते. त्यातून बालकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढीस लागते.

**5. पालकांचा पुर्नविवाह**

कौटुंबिक तणावातून वेगळया झालेली अनेक दांपत्यें आपल्याला अपत्य असतांनाही पुर्नविवाह करतात. अशावेळी त्यांच्या मुलांना सावत्र वडील किंवा सावत्र आई यांचा जाच सहन करावा लागतो. सहाजिकच अशी मुले मनाने अतिशय दुखावली जातात. आणि त्यांच्या भावना व जाणिवांचा विचार केला जात नाही.

**6. व्यसनाधिनता**

पालकांची व्यसनाधिनताही अनेकदा त्यांच्या पाल्यांच्या समस्यांचे कारण असते. पालकांच्या व्यसनाधिनतेचा अप्रत्यक्ष परिणाम मुलांच्या वागण्यावर तसेच इतरांना टाळण्यात होतांना दिसतो. परिणामी मोठी झाल्यावर मुले व्यसनाच्या आहारी जाण्याची शक्यता नाकरता येत नाही. आपले व्यसन पूर्ण करण्यासाठी ही मुले मग घरात चोऱ्या करणे, पालकांशी खोटे बोलणे असे प्रकार करतात.

**7. शैक्षणिक समस्या**

आधुनिक काळात निर्माण झालेली ही एक प्रमुख समस्या आहे. आज प्रत्येक पालक आपल्या पाल्यांना वयाच्या तिसऱ्या वर्षापासून इंग्रजी माध्यमातून षिक्षण देण्याचे किंवा अल्प उत्पन्न गटातील लोक अंगणवाडी केंद्रातून शिक्षण देतांना दिसतात. यामुळे मुलांना खेळण्यास मिळणारा वेळ हा कमी झाला आहे. त्यातल्या त्यात त्यांच्या कडून मोठया प्रमाणावर करवून घेतला जाणारा अभ्यास यामुळे मुले आपले बालपण विसरु लागले आहेत.

**8. कुपोषण**

कुपोषण हे अपुऱ्या आणि असंतुलित आहारामुळे निर्माण होते. जन्माच्यावेळी वजन कमी असणे हे कुपोषणाचे प्रमुख कारण आहे. राष्ट्रीय पोषाहार संस्थेच्या अहवालानुसार, कुपोषणाशी निगडीत सर्वात धोक्याच्या स्थितीत असणारा गट हा सहा महिने ते दोन वर्षे या काळातील असतो. त्यामुळे बाळाची प्रतिकार शक्ती कमी होते. गर्भावस्थेतील मातांचा अपुरा आहार आणि नियमित औषधांचा अभाव यामुळे हे कुपोषणनवजात बालक आणि 0 ते 3 वर्षापर्यंतच्या बालकांना जिवघेणे ठरत आहे.

**9. बालमजुरीचे वाढते प्रमाण**

बालमजुरी ही देशातील अत्यंत ज्वलंत समस्या आहे. बालकामगार स्तर व आंतरराष्ट्रीय आरोगानुसार बाल कामगारांचे प्रमाण प्रतीवर्षी 5 प्रतिशतने वाढत आहे. पाच दशकापासून भारत सातत्याने बाल कामगारांच्या विकास योजनांवर सबळ नियंत्रण ठेवून आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र 17 कोटी पेक्षा जास्त बालकामगार भारतात आहेत. त्यातील दोन कोटी कामगार हे विविध कारखान्यात आहेत. काही लघुउद्योगात तर काही नौकरी क्षेत्रात काम करतात. मोजता न येण्यासारखी बालके घरगुती नौकर म्हणून आहेत. 11 लक्ष ते 14 लक्ष बालके रस्त्यावरची बालके आहेत. यातील काही स्वयंरोजगार करणारी तर काही बूटपॉलीश, वर्तमानपत्रे विकणे, रेल्वेत हमाली करणे इत्यादी कामे करतात. तर काही भिकारी सुदधा आहेत.

**बालमजुरीचे प्रकारः**

1. आईवडिलांबरोबर कुटुंबाच्या मालकीच्या शेतामध्ये काम करणे
2. शेती क्षेत्रात वेठबिगारीवर इतरांकडे काम करणारी मुले
3. धोकादायक व्यवसायात काम करणारी मुले
4. घरगुती किंवा ग्रामोद्योगात काम करणारी मुले
5. आपल्या गावापासून आणि आईवडिलांपासून दुर राहिलेली मुले.
6. अधिकृत कारखानदारी उद्योगातील बालमजूरी

संपूर्ण जगाचा विचार केला तर आज जे देश गरिब आहेत. तेथे गरिबी कुपोषण अनारोग्य, बालगुन्हेगारी, भिक्षावृत्ती अशा समस्या वाट्याला आलेल्या बालकांची संख्या लक्षणीय आहे.

### 10. बालमजुरांचे शोषण

बालमजुरी ही समस्या केवळ 14 वर्षाआतील मुलांनी काम करणे एवढयावर संपत नाही तर या बालकांचे मालकांद्वारे होणारे शोषणही त्यांच्या विकासाला अडथळा निर्माण करते. यामध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश होतो.

- बालकांकडून दहा ते बारा तास काम करून घेणे.
- जास्त काम करून घेवून कमी मोबदला दिला जातो.
- काम करणाऱ्या लहान मुलींचा मालकांकडून लैगिक छळही केला जातो.
- बालकांकडून काही वेळेस गैरकायदेशीर कामेही करून घेतली जातात.
- कामाच्या ठिकाणी त्यांना विशिष्ट सोयी, सुविधा पुरविल्या जात नाही.

थोडक्यात, बालकांच्या भरवशावर मालक अफाट नफा कमवितात आणि निरागस बालकांना मात्र सामाजिक, आर्थिक शोषणाचा सामना करावा लागतो.

### 11. अपघात आणि विषबाधा

अपघात आणि विषबाधा ही मुलांची एक सामान्य समस्या आहे. कारण, घरी, रस्त्यावर, शाळा इत्यादी ठिकाणी ते यांना बळी पडू शकतात. त्यांना भाजल्यावर जखमा होतात, पाण्यात बुडतात, विषबाधा होणे, इलेक्ट्रीक शॉक बसणे इत्यादी अपघात ही मुलांच्या जीवनात होतांना दिसून येतात.

### 12. बालमृत्यू

बालमृत्यूचे एक महत्त्वाचे कारण कुपोषण किंवा मुलांची उपासमार असते. कुपोषणाने बाळाची प्रतिकारशक्ती कमी होते. त्यामुळे लवकर आजार होतात. पण ते लवकर बरे होत नाहीत. आजारपणामुळे कुपोषण वाढते. असे मूल दगावण्याची शक्यता असते. एखादा आजार ताप, जुलाब, अतिसार किंवा खोकला यापैकी कोणताही आजार असू शकतो. यामुळे होणाऱ्या बालमृत्यूमुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

### 12. बालवयातल्या मानसिक समस्या

बालवयातील मुले या सुदधा समस्येला तोंड देतांना दिसत आहेत. सुमारे पाच ते दहा टक्के मुलांच्या बाबतीत मानसिक समस्या असतात. यामध्ये प्रामुख्याने वयाच्या मानाने अयोग्य वागणूक, दहा वर्षाच्या मुलांनी अंथरुणात लघवी करणे, वयाच्या हिशेबाप्रमाणे काम व जबाबदारी नीट न पार पाडणे. मानसिक अक्षमताख चोरी करणे, खोटे बोलणे, कमी समज आणि स्मरणशक्ती, इत्यादी समस्यांची वेळीच काळजी घेतली नाही तर अशी मुले गुन्हेगारीकडे वळण्याची शक्यता असते.

### 12. कौटुंबिक आधार

बालपणात आईवडीलांचे प्रेम मिळणे हे मानसिक स्वास्थासाठी आवश्यक असते. मूल प्रमाने सांभाळणे, हिडीसफिडीस न करणे, त्याला समजून घेणे आणि समजावून सांगणे, मारझोड न करणे, शांतपणे शिकविणे, आजूबाजुच्या लोकांशी चांगले संबंध ठेवायला सांगणे इत्यादी गोष्टी आवश्यक असतात. लहानपणी असुरक्षिततेची व भितीची भावना मुलांच्या मनात बळकावली तर मुलांवर मानसिक दुष्परिणाम होतात. यांचे पडसाद पुढच्या आयुष्यात उमटतात यामध्ये प्रामुख्याने मानसिक दौर्बल्य, आत्मविश्वास नसणे, गुन्हेगारी स्वभाव हे काही अंशी घडण्याची शक्यता नाकरता येत नाही. म्हणून कुटुंब ही मानसिक स्वास्थांच्या दृष्टिने खूप महत्त्वाची आहे.

### 13. टि.व्ही. पाहण्यातून निर्माण होणाऱ्या समस्या

लहान मुले मोठया प्रमाणावर टि.व्ही पाहतात. यामुळे त्यांना चांगल्या आणि वाईट दोन्ही गोष्टी शिकायला मिळतात. परंतु चांगल्यांच्या तुलनेत वाईटाचे प्रमाण जास्त आहे. यातून मुलांच्या समस्या वाढत जातात.

### 13.बालगुन्हेगारी

बालगुन्हेगारी ही आधुनिक समाजाला भेडसावणारी एक समस्या आहे. ही समस्या प्रामुख्याने औद्योगिककरणाबरोबर झाली. कारखाने निघाले आणि घरगुती व्यवसायात गुंतलेली हजारो कुटुंबे घरामधून बाहेर आली. मुलांना बाहेरील समाजाचा स्पर्श झाला. आणि बालगुन्हेगारीची सुरुवात झाली.

बालगुन्हेगारी ही प्रामुख्याने शहरी समस्या आहे. कारण, बालगुन्हेगार शहरातच जास्त आढळतात. बालगुन्हेगारी वाढत जाणे म्हणजे घरातून, कौटुंबिक समस्या व अस्वस्थता निर्माण होते. शाळातील वातावरण बिघडणे, दुसऱ्या मुलांवर चुकीच्या आर्दशाचा परिणाम होणे आणि लहानपणीच गुन्हे करण्याची सवय जडल्याने एकंदर सर्वच गुन्हेगारी वाढणे, ज्या देशात गरिबी, राजकीय आणि शासकीय दिरंगाई व अव्यवस्था आणि सामाजिक परिवर्तनाचा मंद वेग असतो अशा ठिकाणी बेकारीची व झोपडपटटी वासियांची मुले गुन्हे करू लागतात.

बाल गुन्हेगार म्हणजे वयाने लहान असलेला गुन्हेगार होय, सोळा वर्षाच्या आतील बालकांना बाल समजले जाते. या मुलांपैकी सर्वचजण गुन्हेगार नसतात. बहुसंख्यानां आईवडीलांची माया व छत्र मिळते. आर्थिक परिस्थिती चांगली असून शाळेत वा व्यवसायासात योग्य मार्गदर्शन मिळते आणि लहानपणीच ती विशिष्ट ध्येय धरून मार्गी लागलेली दिसतात. काही लहान मुले अपराध केलेला नसतांनाही प्रतिकूल परिस्थितीत राहत असल्यामुळे गुन्हेगार होतील या भितीने वेळीच इतरांपेखा वेगळी आहेत असे मानले जाते. अशी मुले निराधार, गुन्हेगारीशी संबंधीत असलेली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा मुलांनी गुन्हा करू नये म्हणून वेळीच मार्गी लावले नाही तर ते गुन्हेगार होतात. ही मुले चोरी करणे, खिसे कापणे, मारणे इत्यादी गुन्हे करून पाहतात आणि अपराधी होतात. उनाड, पळून जाणारी, द्रात्य आणि चिडखोर मुले प्रतिकूल परिस्थितीत अपराधी बनण्याची शक्यता असते. मोठया गुन्हेगारांची संगत असलेले मुले पुष्कळदा गुन्हेगार होतात.

### 14.मुलांमधील लिंग भेद

बरेचदा समाजात मुलांमुलीमध्ये भेदभाव केला जातो. मुलींच्या तुलनेत मुलांकडे विशेष लक्ष दिल्या जाते. तसेच त्यांच्या राहणीमानात व खानपानात फरक केला जातो. यामुळे मुलींमध्ये असुरक्षिततेची भावना वाढीस लागते. यातूनच वाढणारी स्त्री भ्रृण हत्येसारखे कामे सुध्दा होतात. त्यामुळे स्त्रियांचे प्रमाण कमी होत चालली आहे. म्हणजेच लिंगभेदातून मुलींना असुरक्षितता तर मिळते तसेच भारतातील महिलांचे प्रमाण सुध्दा कमी होण्याची समस्या निर्माण होत चालली आहे.

### 15.मोबाईलचा वाढता वापर

आधुनिक काळात झपाटयाने वाढत चाललेले तंत्रज्ञान हा लहान मुलांच्या बाबतीत डोके दुखीचा विषय बनला आहे. साधरणतः तीन वर्षापासून मुले मोबाईल हातातळतात. यामुळे एकटक पाहणे, चुपचाप बसणे या समस्या मुलांमध्ये निर्माण होतात. तसेच मोबाईलचा वापर करून 10 वर्षे किंवा पेक्षा जास्त वयोगटातील मुले अनावश्यक व्हिडीयो किंवा सोशल मिडीया जसे फेसबुक, व्हॉटसअप यासरख्या ॲपचा वापर करतात. यामुळे मुले सायबर गुन्हेगारीकडे वळत आहेत. तसेच आपल्यापेक्षा जास्त वयाच्या लोकांशी गप्पा करणे, मैत्री करणे व यातून वाममार्गाला लागणे इत्यादी घडत असल्याचे चित्र सऱ्हास दृष्टिस पडत आहे.

**16.बाल्यावस्थेतील वर्तन समस्या**

बालकांमध्ये आढळणारी ही सुध्दा एक प्रमुख समस्या आहे. यामध्ये प्रामुख्याने वर्तन व वागणूकीची समस्या, आक्रस्ताळपणा, अंथरुण ओले करणे, अंगठा चोखणे, चोरी करणे, खोटे बोलणे, दिवास्वप्न, नखे कुरतडणे या समस्यांचा समोवश होतो.

**17.पालक आणि बालक संबंध**

मता पिता आणि बालकांच्या वागणूकीचा पाल्यांच्या वागणूकीवर प्रभाव पडतो. यासाठी पालकांनी आपल्या बालकांशी सुलभ व सौदाहर्यपूर्ण संबंध ठेवावे जेणेकरुण बालक आणि पालकांमधील आत्मीयता व सुलभ संबंध कायम राहतील व बालकांच्या समस्या वाढणार नाहीत.

**18.विशेष मुलांची समस्या**

विशेष मुले म्हणजे शारिरीक अपंगत्त्व आणि मंदीमंदत्त्व असलेली मुले आहेत. या मुलांच्या आपल्या वेगळया समस्या असतात. असे असले तरी या मुलांना चारचौघात योग्य वागणूक दिली जात नाही किंबहूना त्यांना एखाद्या खोलीत डांबवून ठेवले जाते त्यांना इतरासमोर आणले जात नाही. आई वडील आपल्या दुसऱ्या अपत्यांवर या अपत्यांच्या तुलनेत जास्त लक्ष देतात त्यामुळे या मुलांच्या मनावत अतिशय खोल परिणाम होतो. प्रसंगी त्यांचा मृत्यू होतो.

**मुलांच्या समस्या सोडविण्यासाठी उपाय**

1. पालकांनी आपल्या पाल्यांवर जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.
2. आई वडील दोघेही अर्थाजन करित असतील तर त्यांनी आपल्या कुटुंबातील मोठया व्यक्तीजवळ आपल्यापाल्यांना ठेवावे.
3. आपला बालक टि.व्ही पाहत असतांना अनावश्यक बाबींकडे लक्ष देत असतील तर त्यांचे लक्ष चांगल्या गोष्टीकडे वळविण्याचा प्रयत्न करावा.
4. मुलांच्या आवडीच्या खेळात स्वतः त्याच्यासोबत सहभागी व्हावे.
5. बालकांमधील कुपोषणाची समस्या टाळण्यासाठी मुलांना सकस आहार, सर्व प्रकारच्या प्रतिबंध कलसी आणि औषधी द्याव्यात.
6. मुलांमध्ये स्वच्छतेच्या, चांगल्या बोलण्याच्या सवयी वाढवाव्यात. तसेच नखे काढणे, हातपाय स्वच्छ धुणे, वेळेवर झोपणे, लवकर उठणे अशा सवयी वाढविल्याने त्यांना योग्य वळण लागण्यास मदत होते.
7. बाल मजुरी थांबविण्यासाठी प्रामुख्याने अनाथ व ज्यांना आर्थिक आधार नाही अशा बालकांना सामाजिक संस्थांनी दत्तक घ्यावे किंवा त्यांचे पालकत्व स्विकारावे ज्यामुळे ते शोषणाचा बळी पडणार नाहीत.
8. मुलांना पाहिजे ते आणि पाहीजे तेव्हा हवे अशाप्रकारचा त्यांचा अट्टाहास पूर्ण करू नये तसेच आपल्या मूलांच्या गरजा मात्र ताबडतोब पूर्ण कराव्या म्हणजेच तो आपल्या गरजांच्या पुर्ततेसाठी चोरी करणार नाही किंवा खोटे बोलणार नाही.
9. लहान मुलांना वयाची अठरा वर्षे पुर्ण होण्याआधी दुचाकी वाहन पालकांनी चालविण्यास देता कामा नये. तसेच मोबाईल सुध्दा हाताळण्यास मज्जाव करावा.
10. पालकांनी मुलांमध्ये वाढत चालेल्या मानसिक समस्या तत्काळ ओळखाव्यात तसेच त्यांचे समुपेदशन करावे. त्यांच्यातील अयोग्य शारिरीक आणि मानसिक बदलाची कल्पना त्यांचे शिक्षक आणि डॉक्टर यांना द्यावी.
11. मुलामुलींमध्ये लैगिक भेद टाळावा मुलांप्रमाणे मुलींनाही शिक्षणाची संधी द्यावी त्यांना योग्य पालकत्त्व आणि राहणीमान बहाल करावे जेणेकरुन त्यांच्यात असुरक्षितता वाढीस लागणार नाही.

12. बाल मजुरीचा नायनाट करण्यासाठी 14 वर्षाखालील बालकांना कामावर ठेवता कामा नये तर अशाप्रकारचा मजुर जर काम मागत असेल तर सामाजिक संस्थांना तत्काळ संपर्क करुन सदर बालकाचे पालकत्व घेण्याची विनंती करावी.
13. आश्रमशाळा, निवासी शाळा यामध्ये बालीकांचे होणारे शारिरीक व मानसिक शोषण टाळता यावे यासाठी तेथे महिला पर्यवक्षेक व महिला वर्गांची भरती करावी तसेच बालिकांना शैक्षणिक समस्या उदभवणार नाहीत याची काळजी घ्यावी.
14. मुलांचे शाळेतील प्रमाण वाढविण्यासाठी प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करावे.
15. कामासाठी शाळेतून गळती झालेल्या मुलांसाठी सेतू शाळा, अंशकालीन वर्ग व त्याद्वारे त्यांना शाळेच्या मुख्य प्रवाहात आणणे.
16. धोकादायक व्यवसायात काम करणाऱ्या मुलांची त्वरीत मुक्तता करणे.
17. पालकांना अर्थोत्पादनासंबंधी प्रशिक्षण देउन रोजगाराची अधिक संधी उपलब्ध करुन द्यावी.
18. प्रसार माध्यमांच्या माध्यमातून बालकांच्या समस्येला वाचा फोडावी त्यासाठी मुलांवर होत असलेले अत्याचार व लैगिक छळ याबाबत गुन्हा नोदंविता येणाऱ्या हेल्पलाईन बद्दल माहिती देउन जनतते जागृती करावी.
19. बालगुन्हेगारी व बालमजूरी थांबविण्यासाठी वृत्तपत्रातून जनजागृती करावी.
20. बालकांचा विकास करण्यासाठी धोरण आणि योजना आखण्याबरोबर कार्यशाळा आणि चर्चासत्रांचे आयोजन करावे.
21. कुपोषण टाळण्यासाठी पालकांनी फक्त महागडे पौष्टिक पदार्थ न देता बालकांना वटाणे, शेंगदाणे, तीळ, राजगिरा, नाचणी तसेच सर्व प्रकारच्या डाळी आणि हिरव्या पालेभाज्या पासून तयार पदार्थांचा आहार द्यावा.
22. बालसंगोपनातील महत्त्वपूर्ण घटक म्हणजे माता होय. यासाठी मातांना आपले कौटुंबिक ताणतणाव विसरुन आपल्या बालकांच्या संगोपनावर भर द्यावा.

वरील प्रकारचे उपाय प्रत्यक्ष कृतीत आणिले असता बालकांच्या समस्यांचा गंभीर प्रश्न सोडविता येऊ शकतो. आजचे बालक हे उद्याचे भावी नागरीक होय. तेव्हा तेच जर कार्यक्षम, सक्षम नसेल तर देशाची अर्थव्यवस्था कोलमडेल म्हणून या गंभीर समस्येवर वेळीच उपाय करणे काळाची गरज आहे.

**संदर्भ :**


- खडसे इंदिरा, पोषण व आहार शास्त्र, हिमालया पब्लिशिंग हाउस, मंबुई.
- खडसे इंदिरा, बालविकासशास्त्र, हिमालया पब्लिशिंग हाउस, मंबुई.
- जुननकर कुसूम, मातृकला, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर.
- फरकाडे त्रिवेणी, सुलभा गोंगे, बाल विकासाची मुलतत्त्वे, पिंपळापूरे पब्लिशर्स, नागपूर.

# महाराष्ट्रातील बालकांच्या समस्या आणि उपाययोजना

**प्रा. डॉ . गणेश शामराव बोरकर ,**
सहयोगी प्राध्यापक ,
श्रीमती. पी . डी . पाटील समाजकार्य
महाविद्यालय, खडकी बु ,
ता . जि . अकोला

**गोषवारा -**

युनिसेफचे कार्यकारी संचालक जेम्स पी .ग्रॅट यांच्या मते बालकांच्या शारीरीक व मानसिक विकासाचे रक्षण ही समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक विकाससाठी केली गेलेली सर्वात महत्वाची गुंतवणंक होय. व्यक्तीचे कर्तृत्व त्यांच्या बालपणावर अवलंबून असते असे वर्डस्वर्थ म्हणाला होता . एखाद्या प्रौढाची उत्पादकता बालपणी वाढताना आणि विकसित होताना त्याला मिळालेलया संधीवर अवलंबून असते आर्थिक व जबाबदारी प्रत्येक वर्षापार पाडावयाची असते , हे बिंबवण्याचा प्रयत्न ही संस्था न कंटाळता करीत असते . बालकांच्या संरक्षणार्थ अनेक कायदे केंद्र आणि राज्य शासनाकडुन करण्यात आली आहेत . बालकांसाठी राष्ट्रीय धोरण आखण्यात आले आहे . भारताच्या पंचवार्षिक योजनेमध्ये बालकल्याणाचे प्रतिबिंब आपणाला दिसुन येते . बालके हे राष्ट्राची संपत्ती असुन त्यांचे संरक्षण आणि संगोपण करणे आपली जबाबदारी समजणे गरजेचे आहे . राज्य शासनाकडुन एकात्मिक बालविकास सेवा याजना २ ऑक्टोबर १९७५ रोजी संपुर्ण देशात सुरू केली गेली ० ते ६ वर्षे या वयोगटातील बालकांच्या पोषणाचा आणि आरोग्याचा दर्जा सुधारणे , बालकांच्या योग्य मानसिक शारीरीक व सामाजिक वाढीला अनुकुल पाया निर्माण करणे , बालमृत्यु , बालकांचे रोग, कुपोषण तसेच शिक्षण पुर्ण होण्यापूर्वी शाळा सोडण्याच्या प्रवृत्तीत घट मातेची संगोपनविषयक क्षमता वाढविणे , पर्यायाने बालकांच्या सर्वसाधारण आरोग्यविषयक आणि आहारविषयक गरजा पु-या करणे हे योजनेचे मुख्य उद्देश निचित करण्यात आले आहेत या योजनेत लाभार्थी म्हणुन १५ ते ४४ या वयोगटातील महिलांचा समावेश करण्यात आला आहे .

अनेक आवाहाने उभे आहेत आज ही राज्यात आणि देशात मोठया प्रमाणात बालकांवर अन्याय, अत्याचार होत आहेत यामध्ये लैंगिक अत्याचाराचे प्रमाण सर्वाधिक आहे , देहव्यापर, मादकपदार्थाची तस्करी या करीता बालकांचा वापर, बालकामगार , शिक्षणचा अभाव , अनिष्ठ रूढी पंरपंरा यामुळे बालकांचे बालपण हरवलेले आहे . शिक्षणाचा अभाव , दारिद्रय व स्थालांतंरित कामगार यामुळे बालकांची होरपळ होत आहे. गुन्हेगारी स्वरूपाचे आरोप असलेल्या महिला आरोपींच्या बालकांची परिस्थीतीतर फारच बिकट आहे . महाराष्ट्रात कौटुबिक कलहामुळे घटस्फोटाचे वाढते प्रमाण , घटस्फोटामुळे माता पिता विभक्त होत असल्यने बालकांची होरपळ होत आहे . गुन्हेगारी जगतामध्ये बालकांचा मोठया प्रमाणात वापर हा चिंतेचा विषय ठरला आहे. महाराष्ट्रातील स्वयंसेवी संस्थेकडुन चालविण्यात येणारे अनाथलय , बालकाश्रम, दत्तकसंस्था समाजकार्यपेक्षा व्यावसायीकतेकडे वळलेले दिसुन येत आहेत , मोठया प्रमाणत या संस्थेमध्ये बालकांवर अन्याय होत असल्याचे प्रकरणे समोर येत असुन शासनासमोर पेच निर्माण झाला आहे . शासनाकडुन चालविण्यात येणा-या संस्थेमध्ये बालकांचे अमानुष हात व शोषण होत असल्याच्या घटना समोर आल्या आहेत . **बालकांच्या भविष्याबाबत उभे असलेले आवाहने या बाबत अभ्यासकरतांना संशोधकांनी बालकांच्या संदर्भातील समस्या, उपाय योजना स्वयंसेवी संस्था , राज्य व केंद्र शासनाची भुमिके मुळे बालकांच्या सद्या स्थितीवर काय परिणाम झाला याचा अभ्यास करून निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला आहे .**

**मुलभुत संकल्पना -**

1- राज्य व केंद्र शासन - राज्य घटनेतील व्याख्या व व्याप्तीमध्ये समाविष्ठ परिभाषेनुसार

2- बालक - बाल न्याय अधिनियमामध्ये नमुद १८ वर्षाखालील बालके.

3- बाल हक्क - संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आम सभेने मंजूर केलेल्या बाल हक्क सनदेमध्ये नमुद केलेले बालकांसाठीचे हक्क होय .

4- काळजी आणि संरक्षणाची गरज असलेली बालके - बाल न्याय मुलांची काळजी आणि संरक्षण अधिनियम २०१५ मधील कलम १(१४)नमुद बालके होय

**प्रस्तावना -**

भारताच्या लोकसंख्येचा चाळीस टक्के भाग बालकांचा आहे त्यांची संख्या साधारण ३७.३ कोटी असुन ती आफ्रिकेतील सेहेचाळीस देशांमधील बालकांच्या एकुण संख्येपेक्षा जास्त आहे . भारतात बालमृत्यूचे प्रमाण दर हजारी १२० असे असुन त्यासाठी असलेल्या १३० देशांच्या यादीत भारत सत्ताविसाव्या क्रमांकावर आहे त्या यादीत शेवटच्या क्रमांकावर असलेल्या स्वीडनमधील बालमृत्यूचे प्रमाण हजारी सात एवढे आहे जन्मलेल्या सातापैकी एक बालक वय पूर्ण होण्यापूर्वी मृत्यु पावते अ जीवनसत्वाच्या कमतरतेमुळे ३० हजार पेक्षा जास्त बालके प्रत्येक वर्षाला आंधळी होतात . संयुक्त राष्ट्रंघटनेने जगभराच्या बाकलकांविषयी वाटणा-या चिंतेतून आणि त्यांची परिस्थिती सुधारण्याचा एक मार्ग म्हणून डिसेंबर १९४६ साली संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या बालकांकरिता आंतरराष्ट्रीय आपत्कालीन अर्थ कोशाची स्थापना केली आहे . ( युनिसेफ ) दुस-या महायुध्दात निराधार झालेलया बालकांना मोठया प्रमाणात आपत्कालीन मदत पुरविणे हा त्यांचा तात्कालिक उद्देश होता . आंतरराष्ट्रीय बालक वर्षासाठी आपला हातभार म्हणून पोलंडने संयुक्त राष्ट्र संघटनेच्या बालकांच्या हक्काविषयीच्या परिषदेची सूचना केली होती .

**उद्यीष्टये -**

1- बालकांच्या संद्या स्थितीचा अभ्यास करणे

2- बालकांच्या समस्यांचे अध्ययन करणे

3- बाल हक्क , संरक्षण व बालकांसंबधीत कायदे जाणुन घेणे

4- बाल कल्याणर्थ उपाययोजना कार्यन्वीत यंत्रणेचा अभ्यासकरणे उदिष्टये निश्चित करण्यात आली होती .

भारतातील सहा ते अकरा या वयोगटातील २.२७ कोटी मुले व २. ६१ कोटी मुली अशी एकुण चार कोटी ब्याऐंजी लाख मुले निरक्षर आहेत . हा अहवाल देणा-या युनिसेफने बालमजूर , बालगुन्हेगार , बालभिकारी आणि दत्तक मुले अश्या अटीतटीच्या परिस्थितीतीतल बालकांचा विचार केलेली नाही . भारतात १. ६० कोटीपेक्षा जास्त बाल मजूर आहेत जो भारताततील श्रमशक्तीचा ५ टकके हिस्सा ठरतो . यातील बहूतेकांचे शोषण केले जाते शकडो मुले बैठबिगारच आहेत . दरवर्षाला भिका-याच्या व्यवसायात लोडण्यासाठी हजारो मुले पळवून नेउन शारीरीकदृष्टया विकृत केली जातात. ही आकडेवारी चिंताजनक आहे या सर्व प्रतिकूल परिस्थितीचा बालिकांवर सर्वात जास्त परिणम घडतो . जर बालके वंचित असतील तर बालिका त्यांच्या दुपटीने वंचित असतात . बालपणीच्या नेहमीच्या वंचनेशिवाय त्यांच्याबाबतीत लैगिक भेदभाव ही केला जाते स्त्री पुरष्यांच्या दरहजार पुरूशामागे नउशे तेहतीस स्त्रिया या प्रमाणावरून दिसून येते. या असमतोलामुळे अनेक सामाजिक समस्या उदभवल्या आहेत आपल्या समाजात बालाकंपेक्षा बालिकास मोठया प्रमाणात कुपोषणग्रस्त आहेत . आजारी पडण्याचे प्रमाणे बालकांपेक्षा बालिकांतच जास्त आहे .

पैगंडावस्थेत व आईपणात या कुपोषित बालिका प्रवेश करीत असल्याचा परिणाम म्हणूनच जन्मणा-या अर्भकांचे वजन धोकादायक ठरेल इतके कमी असते .

**संशोधन पध्दती -**

सदर संशोधनासाठी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला असुन माहिती संकलनासाठी दुययम साधनांचा अवलंब केलेला आहे .

**बाल हक्क आणि बालकांच्या समस्या -**

१. **बालकामगार -** मुलांना पुरेसे आणि सकस अन्न मिळाले पाहिजे तसेच कपडे निवारा आणि शिक्षण आरोगय खेळ अशा काही मुलांच्या गरजा असतात मात्र काही बालकांच्या संदर्भात या गरजा पूर्ण करणे अशक्य बनते. कौटुंबीक कारणांमुळे किंवा कुटूंब दुरावल्यामुळे मुलाना तयांचे हक्क मिळण्याऐवजी बाल वयामध्येच त्यांना काम करणे भग पउते बहूतेक बालकामगार मुले कौटूंकिब आणि आर्थिक परिस्थितीमुळेच काम करण्याय प्रवृत्त केली जातात . कमी पगारात जास्त काम करून घेण्यात येते त्यांचे आर्थीक व शारिरीक शोषण मोठया प्रमाणात केले जाते . त्यांच्या श्रमशक्ती आणि वयोमानाला न झेपवणा-या आणि जोखमीच्या कामामध्ये त्यांना गुतविण्यात येते .

२. **बालभिक्षेकरी -** मुलांचे व्यंग किंवा आजारपणाचे प्रदर्शन केल्यास लोक भीक देतात या वस्तुस्थितीवर आधारीत अल्पवयीनमुलाचे ३ काळजी आणि संरक्षणाची गरज असलेली बालके - बाल न्याय मुलांची काळजी आणि संरक्षण अधिनियम २०१५ मधील कलम १(१४)नमुद बालके होय

३. **व्यसंनांच्या आहारी गेलेली मुले -** जी मुले काही कारणांनी घरातून पळून आलेली आहेत आणि पून्हा कुटूंबात जाउ शकलेली नाहीत अश्या मुलासह अनेक अल्पवयीन मुले बाल कामगार, बाल भिक्षेकरी मुले भूक लागु नये यासाठी नशा करताना दिसुन येतात तर ही मुले ही चंगळवादातून नशे मध्ये सहभागी झालेली आहेत .

४. **परित्यागीत मुले -** अनैतिक संबधातून जन्मास आलेली मुले किंवा पुनविह झाल्यानंतर होणा-या समायोजनामध्ये अडसर ठरू शकनारी मुले ही संबंधीत पालकांकडून त्याग केली जातात अश्या या बालकांना लहान वयात आणि कादेशरीररित्या त्याग कैल्यास त्यांना पुन्हा अपत्यहिन कुटुंबात दत्तक देण्यासाठी प्रयत्न केले जातात मात्र त्याग केल्यापासुन ते नविन कुटुंबात पुर्नस्थापीत होईपर्यत ही बालके अस्थीर बनतात तसेच बरेचदा अनैतिकक संबधातून जन्माला आलेली किंवा विवाहपूर्व अनैतिक सबधामुळे जन्मात आलेली किंवा कुमारी मातेची मुले किंवा काही कारणानी नको झालेली मुले सांभाळतांना समाजाचा बाव असतो अश्या मुलांसह त्या व्यक्तींना बरेचदा समाज स्विकारत नाही म्हणुन अशी मुल अडचणीची वाटु लागतात म्हणून या मुलाना निर्जन ठिकाणी किंवा धार्मिक स्थांजवळ सोडून पालक निघुन जातात अशी मुले मोठया प्रमाणात समस्याग्रस्त दिसुन येतात .

५. **हरवलेली / घरातुन पळून गेलेली मुले -** काही मुलाच्या संदर्भात कुटूंबात त्यांचे एकून घेणारे कोणी नसल्यामुळे किंवा सहनशीतेच्या अभावातून मूले तत्कालीन कारणांमुळे घर सोडुन निघुन जातात प्रवासी साधनांचा विस्तार वाढलेला असलयाने ती देशातील कोणत्याही राज्यातील कोणत्याही शहरात दिशाहिन होवून जातात . हरविलेल्या मुलांपैकी बहुतांश मुले घरी पोहचत नाही आणि अनेक गेरकृत्य कींवा आमिषाला बळी पडतात व वाममार्गनी लागतात किंवा लागवली जातात.

६. **काळजी आणि संरक्षणाची गरज असणारी मुले -** राष्ट्रीय गुन्हे नांदणी विभागाकडुन प्राप्त आकडेवारी नुसार सन २०१२ मध्ये देशात २६,६९४ पेक्षा जास्त अल्पवयीन मुलांशी संबंधीत अपराधंची नोंद झाली आहेतर सन २०१३ मध्येत्यामध्ये वाढ होउन ती संख्या ५८ हजारापेक्षा जास्त झाली आहे . सन २०१४ मध्ये ९० हजारापेक्ष जास्त दिसुन येते . याशिवाय इतर दुर्धर आजारानी ग्रस्त व

इतर समस्यांनी ग्रस्त मुलांना खास संरक्षण व काळजी गरज आहे . (माहिती स्त्रोत national Crime records bureau NCRB )

**महाराष्ट्रात - बालकांची काळजी घेणा-या संस्था -**

दुर्लक्षित अथवा अपराधी बालकाच्या चौकशी बरोबरच त्याच्यात सुधारणा घडवून आणणे त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना तयार करणे हा बाल न्याय अधिनियम २००० चा मुख्य उदेश होय या नुसार महाराष्ट्रात बालकांची काळजी घेणा-या संस्था कार्यन्वीत आहेत ज्यामध्ये बाल गृहे, विशेष गृह , निरिक्षणगृह आणि अनुरक्षण गृहे बालकांची काळजी घेणा-या विविध संस्थांची कार्यपध्दती अधिनियमात ठरवून दिली आहे यातील सदस्य संख्या अधिनियमात सांगितली आहे . किमान एक महिला सदस्य असावी अशी विशेष तरतुद आहे . कुटुंबाभिमुख सेवा - बाल न्याय अधिनियम २००० च्या चौथ्या प्रकरणातील कलमानुसार बालकांला कुटुंबाभिमुख सेवा उपलबध करून देण्यात आल्या आहेत . जसे परिपालन सेवा , बालमार्गदर्शन केंद्र , बालसंगोपन योजना, दत्तक विधान परिपालन सेवेमुळे मुलाच्या शिक्षणात खंड पडत नाही बाल मार्गदर्शन केंद्रामुळे मुलांना वाममार्गापासून परावृत्त केले जाते. या अधिनियमाअंर्तगत शासनाच्या नियंत्रणा काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना करीता विविध योजना व संस्था कार्यन्वीत आहेत जसे शासकिय निरिक्षण गृह किंवा स्वयंसेवी संस्थेच्या वतिने चालविल्या जाणारे निरिक्षण गृह , विशेषगृह शासनाच्या किंवा स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातुन चालविली जातात. बाहगृहे , अनुरक्षणगृहे , बालसंगोपन योजना इत्यादी स्वरूपाच्या आहेत . या सर्व संस्था व उपक्रम तथा योजना बालकांची काळजी व संरक्षण संदर्भातील अधिनियिमाच्या तरतुदीनुसार चालविण्यात येतात यावर शासनाचे पुर्ण नियंत्रण असते .

**हरविलेल्या मुलांना शोधुन - घरी पोहविणे महाराष्ट्र पोलिसांचा मुस्कान अभिनव उपक्रम -**

जी मुले हरवलेली आहे त्यांना विशेष मोहिमेअंतर्गत शोधुन त्यांच्या घरापर्यंत पोहचविण्याचा काम महाराष्ट्र पोलिसांनी उत्तम पध्दतीने केलेले आहे . अनेक मुले हरवलेली आहेत अश्या तक्रारी पोलिस दस्पतरी आहेत , मात्र या बाबत फौजदारी गुन्हा दाखल केला जात नसलयाकारणांनी अश्या मुलांचा शोध फारसा गांभिरतेनी घेता जात नव्हता परिणाम स्वरूप हरवेलेली मुले मोठया प्रमाणात पडळुन किंवा अपहरण करून वाममार्गानी लावण्याचा गोरखधंदा गुन्हेंगारी जगता मध्ये वाढु लागला आणि गुन्हेंगारी क्षेत्रात बालकांचे प्रमाण अचानक वाढल्यामुळे पोलिसांनी मुस्कान नावाने हरवलेल्या मुलांना शोधण्याची मोहिम हाती घेतली शिवाय हरवलेल्या मुलांची तक्रार - अपहरण या फौजदारी स्वरूपाच्या कलमानुसार दाखल करण्यात आली असल्याने पोलिसांना तपास करून क्राईम मिटींग याबाबत वेळोवेळी अहवाल सादर करावयाचा आहे त्यामुळे पोलिसांकडुन हरवलेल्या मुलांपैकी ६० टक्के मुलांचा शोध लावुन अपराध्याला कोठडीत टाकण्यात यश आहे आणि अश्या बालकांचे बालपण परत करण्यात महाराष्ट्र पोलिसांना यश आले . महाराष्ट्रातील काही जिल्हयात मात्र उल्लेखनीय कामगीरी झाली तर काही जिल्हयात पोलिस अधिक्षकांचा निर्हउत्साहामुळे यश प्राप्त होवू शकले नाही .

**बाल हक्कांशी संबधीत कायदे -**

**१.** बाल न्याय ( मुलांची काळजी आणि संरक्षण )अधिनियम २०१५
**२.** पास्को - बाल लैगिंक छळ प्रतिबंध अधिनियम २०१२
**३.** बाल कामगार प्रतिबंध अधिनियम १९८६
**४.** बाल विवाह प्रतिबंध अधिनियम १९७८
**५.** गर्भलिंग चिकीस्ता प्रतिबंध कायदा १९९४
**६.** बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम २००५
**७.** सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा - २०१०

**निष्कर्ष**

१. महाराष्ट्र बालकांची स्थिती मागील दहा दशकाच्या तुलनेत समाधारकारक आहे.

२. बाल हक्क व संरक्षण संदर्भात शासकिय यंत्रणा कुचकामी ठरल्या असुन काही स्वंयंसेवी संस्था हया बालसंरक्षणाच्यासंस्था चालवितांना धंदा करीत व्यावसायीक स्वरूप देत असल्याने उलट या संस्थांकडुन बालकांचे मोठया प्रमाणात मानसीक आणि शारिरीक शोषण होत आहे .

३. बालकांसंदर्भात पास्को कायदयाचे गेरवापर होत असल्याने बालकांना न्याय मिळत नाही शिवाय अन्यायग्रस्त बालके न्यायापासुन वंचीत आहेत , राजकिय हस्तेक्षेप आणि व्यावसायीक संस्था त्यांचे पितळ उघडेपळुनये करीता या अधिनियमाचा गैरवापर करून सामाजीक कार्यकर्तांना अडकविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसुन येते . ज्या संस्थांमध्ये बालकांचे लैगिंक शोषण होत असल्याच्या घटना समोर आल्या आहेत त्यांना चांगला वचक बसलेला दिसुन येतो .

४. पोलिस यंत्रणेकडुन अधिनियमातील तरतुदीनुसार बाल हक्क व संरक्षण या बाबत उचित समिती गठीत करण्यात उत्साही दिसुन येत नाही परिणाम स्वरूप कायद्याची प्रभावी अमंलबजावणी केली जात नाही .

५. राजकिय नेतृत्व, कायदे, शासन, स्वयंसेवी संस्था, शासकिय यंत्रणा , बाल हक्क आयोग यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव दिसुन येतो.

६. **व्यापक जनजागृतीचा अभाव** - बालकांचे हक्क , संरक्षण संदर्भात अधिनियम आणि कार्यन्वीत शासकिय यंत्रणे विषयक सर्व सामान्य नागरिक आणि लाभार्थीना माहिती नाही परिणाम स्वरूप प्रभावी अमलबजावणी होवू शकत नाही , या करीता शासनाकडुन विशेष प्रयत्न करणे गरजचे आहे शिवाय एनजीओ कडुन सक्रिय सहभाग असणे गरजेचे आहे

७. **काळजी आणि संरक्षणाची गरज असलेली बालके** - बाल न्याय मुलांची काळजी आणि संरक्षण अधिनियम २०१५ मधील कलम १(१४) नमुद बालके होय

**संदर्भ गंथ सुची -**


१ कोतापल्ले लक्ष्मण , भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन व समाजकार्य विद्या बुक पब्लिकेशन , औरंगाबाद

२ कौल एस के, - बाल न्याय, जळगांव महाराष्ट्र

३ बाल हक्क संरखण आयोग अधिनियम २००५ महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार अ महिला व बाल विका विभाग

४ web.site wwwchildineindia.org.in

५ www.commissioneratewcd.gov.in

६ http://womenchil. Maharashrta.gov.in

७ www.wcd.nic.in

# बालगुन्हेगारीची कारणे आणि उपाय

**प्रा. गंगणे आर. व्ही.**
इतिहास विभाग
वसंत महाविद्यालय, केज

## प्रस्तावना :-

आजच्या समाजाला भेडसावणाऱ्या अनेक समस्यापैकी बालगुन्हेगारी ही एक सामाजिक समस्या आहे. औद्योगिकरण, नागरीकरणाबरोबरच अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात, काही शहरी स्वरुपाच्या तर काही ग्रामीण स्वरुपाच्या समस्या आहेत. शहरी सामाजिक समस्यांच्या संदर्भात बालगुन्हेगारी, वेश्यावृत्ती, मद्यपान आणि आंमली पदार्थांचा दुरुपयोग या चार सामाजिक समस्या आहेत. त्यापैकी बालगुन्हेगारी विषयी विस्तृत विवेचन करणार आहोत. बालगुन्हेगारी हा गुन्हेगारीचाच प्रकार आहे. गुन्हेगार आणि बालगुन्हेगार यांच्यात वय (Age) या घटकाबाबत फरक असला तरी गुन्हेगारी समस्येचा एक भाग म्हणून बालगुन्हेगारीच्या समस्याचे स्वरुप भिन्न आहे. उदा. गुन्हा घडल्यानंतर गुन्हेगार व बालगुन्हेगार दोघांना पोलिस पकडतात. परंतु दोघांना एकाच ठिकाणी एकत्र ठेवले जात नाही. गुन्हेगार पालिस कस्टडीत तर बालगुन्हेगाराला **'रिमांड होम'** म्हणजेच बाल अभिक्षणगृहात पाठविले जाते. गुन्हेगार व बालगुन्हेगार यांनी केलेल्या गुन्हयानुसार पोलिस यंत्रणेद्वारे खटले दाखल केले जातात. परंतु या खटल्याची सुनावणी एकाच प्रकारच्या न्यायालयामध्ये होत नाही.

बालगुन्हेगारी वरील खटल्यांची सुनावणी करणाऱ्या न्यायालयाला **बालन्यायालय** म्हणतात. बालन्यायालयातील खटल्यातील कामकाजपध्दती दिवाणी व सत्र न्यायालयातील कामकाज पध्दतीपेक्षा भिन्न असते. बालगुन्हेगारात सुधारणा घडवून आणणे हा त्यांना शिक्षा देण्यामागचा प्रमुख उद्देश असतो. बालगुन्हेगारी खटल्यांच्या सुनावणीनंतर त्याला कोणत्या **'बालगुन्हेगार सुधारसंस्थेत'** पाठवावे आणि किती वर्षासाठी पाठवावे हे बालन्यायालयाद्वारे निश्चित केले जाते. आजचा बालगुन्हेगार हा उद्याचा काही काळानंतरचा भारताचा जबाबदार नागरिक आहे हे लक्षात घेवून त्यांच्या शिक्षेचे स्वरुप ठरवलेले असते.

## 2. उद्दिष्टये :-

१. समाजातील बालगुन्हेगारी समस्यावर प्रकाश टाकणे.
२. बालगुन्हेगारी समस्याचे स्वरुप स्पष्ट करणे.
३. बालगुन्हेगारीच्या शिक्षेच्या स्वरुपाचा शोध घेणे.
४. बालगुन्हेगारीच्या या समस्याच्या निर्मितीच्या कारणांचा शोध घेणे.
५. बालगुन्हेगारी समस्येची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करणे.
६. बालकांना बालगुन्हेगारी समस्यापासून परावृत्त करुन भारताचा भावी चांगला नागरिक बनविण्यासासठी विविध उपाय सुचविणे.

## 3. गृहितके :-

१. भारतीय समाज व्यवस्थेत बालगुन्हेगारीची समस्या मोठया प्रमाणात भेडसावते आहे.
२. बालगुन्हेगार व इतर गुन्हेगार यांच्या शिक्षेच्या स्वरुपात फरक जाणवतो.

**३.** ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात बालगुन्हेगारीचे प्रमाण अधिक आहे.

**4. संशोधन पध्दती :-**

सदरील शोध निबंधाच्या संशोधन पध्दतीत वर्णनात्मक पध्दतीत संश्लेषण, विश्लेषण पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

**5- तथ्य संकलन :-**

सदरील शोध निबंधातील तथ्य प्राथमिक स्त्रोत व द्वितीय स्त्रोत यांच्या माध्यमातून संकलन करण्यात येत आहे. संदर्भ ग्रंथ, मासिके, मुलाखत, निरीक्षण इ. चा वापर करण्यात येणार आहे.

**6. बालगुन्हेगारी समस्याचा ऐर्ति ासिक आढावा :-**

औद्योगिक क्रांतीपूर्वी वयाने लहान असणारी मुले गुन्हेगार नव्हती असे नाही, पण 19 व्या शतकात युरोपीय देशातील वसाहतीमध्ये औद्योगिकरणाचा प्रसार, कारखाने व गिरण्या यांनी शहरे व्यापली. ग्रामीण भागातील कुटूंबे शहराकडे धाव घेवू लागली आणि शहरी भागात त्यांची व्यवस्था योग्य प्रकारे होत नव्हती. याचा परिणाम शहरामध्ये गर्दी, दारिद्रय व झोपडपट्टीमध्ये वाढ झाली, लहान मूलांकडे दुर्लक्ष झाले. लहान मुलांवर वाईट संस्कार करणारी परिस्थिती शहरामध्ये निर्माण झाली. म्हणून 19 व्या शतकात युरोपीय देशांना व वसाहतीमधील समाजात बालगुन्हेगारीच्या समस्येची जाणीव झाली आणि म्हणून या बालगुन्हेगारीवर वेगवेगळे कायदे करण्यात येवू लागले.

20 व्या शतकात दोन महायुध्द झाली या महायुध्दाची झळ कमी अधिक प्रमाणात जगातील सर्व राष्ट्रांना बसली. महायुध्दामुळे पाश्चात्य राष्ट्रात अनेक कुटूंबे उध्दवस्त झाली. हजारोंच्या संख्येने लहान मुले पोरकी झाली व उनाडक्या करत शहरात भटकू लागली. चोरटा माल व आंमली पदार्थाची ने-आण व विक्री यासारख्या प्रौढ व्यक्तींच्या गुन्हयात लहान मुलांना वापरले जाऊ लागले. औद्योगिकरण व आधुनिकीकरणाच्या प्रक्रिया प्रारंभ झाल्यामुळे हीच परिस्थिती कमी-अधिक प्रमाणात अन्य देशातही निर्माण झ ाली, म्हणून बालगुन्हेगारी ही समस्या आधुनिक समाजाला भेडसावू लागली आहे.

**7. बालगुन्हेगारीचे स्वरुप :-**

बालगुन्हेगारी ही शहरी समस्या आहे. ग्रामीण समुदायात बालगुन्हेगार नसतात असे होत नाही. कारण खोटे बोलणे, मोह न आवरुन छोटया मोठया वस्तू पळविणे, उनाडक्या करत फिरणे, शिक्षा किंवा माराच्या भितीने लपून बसणे किंवा वेळप्रसंगी घर सोडून पळून जाणे असे प्रकार ग्रामीण भागात सर्रास घरोघरी दिसून येतात. परंतु जेथे मुलांवर लक्ष ठेवण्याच्या दृष्टीने कुटूंब संस्थाच दुर्बल ठरते. तेथे अशा मुलांचा प्रश्न गंभीर स्वरुप धारण करतो ही स्थिती विशेषतः शहरात असते म्हणून तेथे बालगुन्हेगारीची समस्या ही शहरी समस्या आहे.

**8. बालगुन्हेगारी म्हणजे काय ?**

बालगुन्हेगार असणारा मूलगा किंवा मुलगी अन्य मुलांपेक्षा वेगळा नसतो. म्हणजे अन्य मूलांसारख्याच इच्छा, आकांक्षा व प्रेरणा त्यालाही असतात. बालगुन्हेगार असणारी मुले अपसामान्य नसतात. म्हणजे मंदबुध्दीची असतातच असे नाही. मंदबुध्दीच्या मूलांना वाईट रितीने वागविले जात असेल किंवा मंदबुध्दी असणाऱ्या मुलांच्या सभोवताली अयोग्य सामाजिक वातावरण असेल तर ती बालके बालगुन्हेगारीकडे वळतात. वैधानिक किंवा कायद्याच्या दृष्टीकोनातून बालगुन्हेगारीचा अर्थ करतांना वय (Age) हा घटक सर्वात महत्वपूर्ण मानला जातो. कोणत्या वयोगटातील मुलांना बालगुन्हेगार संबोधावे

याबाबत प्रत्येक देशात भिन्न स्वरुपाच्या कायदेशीर तरतुदी आहेत. सामान्यपणे 7 ते 16 किंवा 18 या वयोगटातील मुलांनी अपराधीकृत्य केल्यास त्यांना **'बालगुन्हेगार'** असे म्हणावे.

**9. भारतात बालगुन्हेगारी बाबतची कायदेशीर तरतुद :-**

भारतीय दंडसंहितेच्या 83 व्या कलमात पुढील प्रमाणे तरतुद आहे. ज्या मुलामुलींचे वय 12 ते 16 किंवा 18 वर्षाचे आहे व समाजाला घातक असे कृत्य त्याने केले तर त्याला बालगुन्हेगारी असे संबोधावे. भारतीय दंडसंहितेच्या 82 व्या कलमात सात वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्या मुलांना कोणत्याही गुन्हयासाठी दोषी धरण्यात येवू नये तसेच ज्या मुलांची बौध्दीक व मानसिक परिपक्वता विकसित झालेली नसते तशा मुलांसाठी सात वर्षाऐवजी 12 वर्षापर्यंत ही वयोमर्यादा वाढविता येईल अशीही तरतुद आहे.

**10. बालगुन्हेगारीची कारणे :-**

बालगुन्हेगारीकडे वळण्यासाठी मुलांशी काही वैयक्तिक कारणेही जबाबदार असतात. उदा. शारीरिक कारणे, मानसिक कारणे. सामाजिक कारणे म्हणजे कुटूंबाच्या दडपणाचा प्रभाव कमी असणे. आर्थिक टंचाई, सामाजिक नियंत्रण शिथील असणे, या सर्वांमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीची प्रेरणा घेवून केलेले दृष्क्रृत्य गुन्हा ठरतो. निराशा, भिती असुरक्षितता, मनावरील नियंत्रणाचा अभाव, नकारात्मक कल्पना इ. कारणांमुळे बालगुन्हेगारीत भर पडते.

तसेच बालवयातील मानसिक उणिवा, तसेच शारीरिक घटकही महत्वपूर्ण आहेत. लहान वयात काही मूलांना मेंदूचे विकार जडतात त्याची स्मरणशक्ती व बुध्दी क्षीण होते. स्वभाव चिडका होतो. ग्रंथीच्या विकारामुळे काही मुळे अतिशय मंद किंवा तडतडी होतात. अशी मुले शारीरिक दोषांमुळे अन्य सामान्य मुलांशी तुलना झाली की ते निराश होतात.

तसेच काही मुले हे परिस्थितीजन्य घटक जबाबदारीमुळे बालगुन्हेगारीकडे वळतात. उदा. कुटुंब : आधुनिक समाजात कुटूंब व्यवस्था विस्कळीत झाली आहे. शहरामध्ये मिळेल त्या व मिळेल तशा जागेत राहाणे भाग पडले. छोटया घरांमध्ये बरीच मंडळी राहू लागली की, लहान मुले विविध प्रसंग जवळून बघतात. आई, वडिल आणि नातेवाईकांची भांडणे, घरातील लबाडी, ढोंग, खोटेपणा यांची त्यांना माहिती होते. मोठयांच्या व्यसनाची आणि दुर्गूणांची त्यांच्यावर छाप पडते. योग्य काय व अयोग्य काय? याबद्दल कुटूंबात नेहमीच मार्गदर्शन होते असे नाही. अशा प्रकारच्या कौटुंबिक वातावरणात बालकामध्ये गुन्हेगारीच्या प्रवृत्ती निर्माण होतात.

तसेच कुटूंबाची दुभंगावस्था म्हणजेच पती-पत्नीमधील भांडणे, दुरावे, घटस्फोट, पतीचे किंवा पत्नीचे कुटूंबा बाहेरचे अनैतिक संबंध, कौटुंबिक ताण-तणाव, कठोर शिस्त किंवा कठोर नियंत्रण म्हणजे मुलांवर वाजवीपेक्षा जास्त वैयक्तिक लक्ष ठेवणे, सतत धाकाखाली वावरणे इ. प्रकारामुळे मुलांना बालपण कंटाळवाणे वाटू लागते. मुलांना कुठे स्वतंत्रपणे जाण्याची किंवा कोणत्याही वातावरणाशी जुळवून घेण्याची सवय होत नाही. ती मुले मनाने दुबळी व परावलंबी होतात. मग अशावेळी आई-वडिलांच्या धाकाला न जुमानता एखाद्यावेळी घरातून पळून जातात.

आई वडिलांच्या अतिभावुकतेची स्थिती लहान मुलांमध्ये अपराधीपणाची प्रवृत्ती निर्माण होण्यास कारणीभूत ठरते. आई किंवा वडिल या दोघांपैकी कोणी एक तरी भावनात्मकदृष्टया अस्थिर असेल तर

मुलांवर परिणाम होतात. कुटूंबाची आर्थिक स्थिती म्हणजे दारिद्रय, बेकारी यामुळेही मुलांच्या विविध गरजा पूर्ण करण्यास आई वडिल असमर्थ ठरतात. तेव्हा मुलांवरील कुटूंबाचे नियंत्रण कमी होण्याची शक्यता असते. तेव्हा ही मुले आपल्या गरजा भागविण्यासाठी घराबाहेरच प्रयत्न करतात. मित्रसमुहामुळे ही मुले गुन्हेगारीकडे वळतात. लहान मुलांना कोणते मित्र चांगले व कोणते वाईट हे ओळखता येत नाही. मैत्री संबंधातून वाईट गोष्टीचे अनुकरण करु लागतात. वाईट संगत लागली आहे याकडे त्यांच्या पालकांचे लक्ष नसेल किंवा ही गोष्ट त्यांच्या लक्षात लवकर आली नसेल तर लहान मुलावर दुष्टकृत्य करणाऱ्या टोळीचे दडपण वाढते व मुल गुन्हेगारीकडे वळते.

विशिष्ट क्षेत्रातील सामाजिक वातावरण शहरातील बालगुन्हेगारीच्या घटना सर्वात जास्त कोठे घडतात? तर प्रचंड लोकसंख्या असणाऱ्या शहराच्या किंवा महानगराच्या मध्यवर्ती भागात अधिक गर्दी असते. शहरातील बाजारपेठात अधिक गर्दी, विविध आर्थिक उलाढाल सुरु असतात. शहरात अतीगर्दीच्या ठिकाणी फसवाफसवी, उचलेगिरी, काळाबाजार, यासारखी गैर कायदेशीर कृत्य सातत्याने होतात अशा ठिकाणी प्रौढ गुन्हेगाराप्रमाणे गुन्हेगार मुले ही असतात.

गुन्हेगार मुलांच्या दृष्टीने शहरातील अतीगर्दीची जागा म्हणजे गुन्हेगारीचे प्रशिक्षण देणारे केंद्रच होय. गुन्हेगारी करणाऱ्या मुलांच्या टोळया गर्दीच्या भागात अधिक प्रमाणात वावरतात. शाळेतील काही उनाडटप्पू मुलेदेखील अशा टोळयामध्ये सामील होतात. आज केवळ उनाडटप्पूपणा करणारी मुले ही उद्याचे संभाव्य बालगुन्हेगार असतात. आशावृध्दी, वैयक्तिक घटक, परिस्थितीजन्य घटक, भग्न कुटूंब, ताणतणावाचे वातावरण, आई-वडिलांची भावूकवृत्ती, कुटूंबाची आर्थिक परिस्थिती, प्रचंड गर्दीची ठिकाणे, आर्थिक उलाढालीची ठिकाणे इ. ठिकाणी मुले बालगुन्हेगारीकडे वळतात.

## 11. बालगुन्हेगारीवरील उपाययोजना :-

एखादा बालगुन्हेगार निर्माण झाल्यानंतर त्यांच्यामधून उद्याचे प्रौढ गुन्हेगार निर्माण होऊ नयेत म्हणून काही उपाय योजना आवश्यक आहेत. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या बालकात सुधारणा घडवून त्यांचे पुनर्वसन करणे कोणत्याही समाजाला शक्य नसते. कारण बालगुन्हेगारी ही अनेकविध सामाजिक प्रश्नांची आणि मूलामधील शारीरिक व मानसिक दोषांशी निगडीत असते. हे सर्व दोष कायमचे दूर करणे अशक्य असते. पण बालगुन्हेगाराची झळ बसलेल्या मुलांना घडविणे तसेच बालगुन्हेगारीची झळ अधिक मुलांना लागू नये म्हणून काही उपाय योजना करणे गरजेचे आहे. बालगुन्हेगारीसंबंधी कायदे करणे, बालकामधील गुन्हेगारी प्रवृत्ती तयार करुन त्यांच्यामध्ये सुधारणा घडवून आणणे, त्यांना शिक्षा करण्यापेक्षा सुधारणात्मक उपाचारांचा विचार केला पाहिजे. त्यांना सहानुभूती, संरक्षण, मार्गदर्शन आणि मदत यासारख्या बाबींची गरज असते.

ब्रिटिश राजवटीतच भारतात 1884 ला बालगुन्हेगारीसाठी संबंधित कायदा करण्यास प्रारंभ झाला. स्वातंत्र्यपूर्व काळातच मुंबई, मद्रास, बंगालमध्ये बालगुन्हेगारीसाठी अधिनियम तयार होते. बालन्यायालय निर्माण करण्याबाबत वैधानिक तरतुद सर्व प्रांतामध्ये नव्हती. अनाथमुले व बालगुन्हेगार एकत्रच ठेवले जात होते अशा पध्दतीने बालगुन्हेगारी विधिनियमाबाबत सर्व घटक राज्यामध्ये वेगवेगळे परिस्थिती होती. विविध स्वरुपाच्या प्रशासकीय अडचणी होत्या.

इ.स. 1960 मध्ये भारतीय संसदेने लहान मुलांचा केंद्रीय कायदा मंजूर केला. या कायद्यामुळे बालन्यायालयाची स्थापना, कारणे व निराधार व निरापराध मुलांसाठी बालकल्याण मंडळ स्थापन करणे या

दोन गोष्टींची तरतुद करण्यात आली. कोणत्याही परिस्थितीत अन्य प्रौढ गुन्हेगारा समवेत बालगुन्हेगारांना तुरुंगात एकत्र ठेवण्यात येवू नये. हे या अधिनियमात नमुद करण्यात आले. बालगुन्हेगारासाठी बालन्यायालयाची निर्मिती करण्यात आली. हे न्यायालय बालगुन्हेगारासाठी न्यायदान करण्याचे कार्य करते. 16 ते 18 वर्षाखालील मुलामुलींच्या खटल्यांची सुनावणी करण्याचे अधिकार फक्त याच न्यायालयाला दिले या न्यायालयाने दिलेल्या निकालाविरुध्द अन्य कोणत्याही न्यायालयात अपील करता येत नाही. बाल न्यायालयाचे प्रमुख कार्य म्हणजे गुन्हेगार मुलांना विश्वासात घेवून त्यांची खरीखुरी माहिती काढून घेणे व त्यांच्या पालकांशी हितगुज करुन गुन्हेगार मुलांमधील गुन्हेगारी प्रवृत्ती नष्ट करण्यासाठी उपाय योजना सुचविणे हे आहे.

बालगुन्हेगारामध्ये सुधारणा घडवून त्यांच्यामधील गुन्हेगारी प्रवृत्ती नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यासाठी विविध प्रकारच्या बालसुधार संस्थ कार्य करीत आहेत.

**1. बालअभिक्षण गृह :-**

बालगुन्हेगारावरील खटल्याची बालन्यायालयात सुनावणी पूर्ण होऊन निकाल लागण्यासाठी देखील वेळ लागतो या संपूर्ण काळात बालगुन्हेगाराला ज्या संस्थेत ठेवले जाते त्याला रिमांड होम / बालअभिक्षणगृह म्हणतात. मुले व मुलींसाठी स्वतंत्र रिमांड होम असतात. भारतात जिल्हा स्तरावर प्रत्येक ठिकाणी ही बालसुधार संस्था निर्माण करण्यात आली आहे.

**2. संमत केंद्र :-**

मुलांने केलेला गुन्हा हा सर्वसामान्य असला तर पालकांच्या स्वाधीन केले जाते किंवा परत अशाप्रकारे गुन्हा होऊ देवू नको अशी समज दिली जाते. परंतु या दोन्ही पैकी कोणतीच उपाय योजना न्यायाधिशाला योग्य वाटली नाही तर गंभीर स्वरुपाचा गुन्हा असल्यामुळे योग्यच नाही त्या बालगुन्हेगाराला सरकारने चालविलेल्या प्रमाणित शाळेत पाठविण्याचा निर्णय देतात. महाराष्ट्रात वर्धा, बुलढाणा, नागपूर अशा 12 ठिकाणी या प्रमाणित शाळा आहेत. यापैकी कोणत्या प्रमाणित शाळेत पाठवायचे हे न्यायाधिश निकालात नमूद करतात. या संस्थेतून मुलांना शालेय शिक्षण, व्यवसाय शिक्षण दिले जाते म्हणजे मुलांना सतत कार्यमग्न ठेवण्याचा उद्देश असतो.

**3. सुधारशाळा :-**

गंभिर स्वरुपाचा गुन्हा करणाऱ्या बालगुन्हेगारास या संस्थेत ठेवले जाते. विभिन्न व्यवसायाचे प्रशिक्षण दिले जाते. या संस्थेतून किमान 3 वर्षे व जास्तीत जास्त 7 वर्षे बालगुन्हेगारास ठेवण्याची तरतुद कायद्यात आहे. या संस्थेतून बाहेर पडणाऱ्या युवकासाठी विविध सेवाभावी संस्थांची मदत घेतली जाते. म्हणजेच पुनर्वसनाचा पाठपुरावा केला जातो.

**4- परिविक्षा वसतीगृह :-** आई वडिल किंवा कुटूंबाचा कोणताही आधार नसलेल्या अनाथ बालगुन्हेगारांसाठी ही संस्था निर्माण करण्यात आली आहे. या संस्थेतून बाहेर पडणाऱ्या मुलांना, व्यवसाय किंवा नौकरीसाठी योग्य ती मदत करण्याचे कार्य ही संस्था करते.

**5- किशोर सुधारालय :-** 15 ते 21 वयोगटातील बालगुन्हेगारांमध्ये सुधारणा करण्यासाठी ही संस्था निर्माण केली आहे. बालगुन्हेगारामधील गुन्हेगारी प्रवृत्ती नष्ट व्हावी व त्यांनी समाजमान्य मार्गाने जीवन जगावे यासाठी ही संस्था प्रयत्न करते.

**6. बालग्राम योजना** :- कौटुंबिक वातावरणात योग्य ते संस्कार करुन त्यांच्यातील गुन्हेगारी प्रवृत्ती नष्ट होऊ शकेते हाउद्देश समोर ठेवून बालग्राम योजना सुरु करण्यात आली. भारतात सन 1967 मध्ये हरियाणात पहिले बालग्राम निर्माण करण्यात आले. या बालग्रामात 20 कुटूंबात प्रत्येकी 10 या प्रमाणे 200 बालगुन्हेगार राहतात. या बालगुन्हेगारांच्या संगोपनाचे कार्य करण्यासाठी 20 मातांची नियुक्ती करण्यात आली आहे.

अशा पध्दतीने बालगुन्हेगारी म्हणजे काय बालगुन्हेगारीची समस्या व त्यावरील उपाय योजना वरील प्रमाणे थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## 12. निष्कर्ष :-

१. समाजामध्ये बालगुन्हेगारीची समस्या ही दिवसेंदिवस वाढत आहे. कारण कुटूंबाची दुभंगावस्था, पती आणि पत्नीमधील ताण-तणावाचे वातावरण, कुटूंबाची आर्थिक परिस्थिती, मुलांच्या वाढत जाणाऱ्या गरजा यामुळे समाजाला एक प्रकारे लागलेली किड आहे.

२. या शोधनिबंधातून बालगुन्हेगारीची समस्या, निर्मितीची कारणे, पुर्वी थोडयाफार प्रमाणात होती पण आजच्या आधुनिक समाजात बालगुन्हेगारीचे स्वरुप वाढतच जात आहे असे निदर्शनास आले आहे.

३. बालगुन्हेगारीची समस्या ही वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे, शहराकडे पलायण त्या ठिकाणची अपुरी जागा, त्या जागेतच त्यांची केलेली व्यवस्था यातून झोपडपट्टीची निर्मिती, तिथे होणारी शिवीगाळ, गलिच्छपणा, हाणामारी, मद्यपान, अनैतिक स्वरुपाचे होणारे लैंगिक व्यवहार इ. गोष्टीचा समावेश असलेल्या वातावरणामुळे ही समस्या बालगुन्हेगारत वाढ होत आहे.

४. बालगुन्हेगारी संपवण्यासाठी शासनाने कायद्यात तरतुद करुन त्यांच्यासाठी वेगळे न्यायदान करण्याची व्यवस्था व निकालावर आधारित त्यांच्या सुधारणा व्हावी म्हणून वेगवेगळया प्रकरणाची सुधारणागृहे, रिमांड होम, इ. ची व्यवस्था केलेली आहे.

५. बालगुन्हेगारीत सुधारणा होण्यासाठी बालसुधारणागृहे निर्माण करुन, त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी प्रशिक्षण देवून व्यवसायासाठी आर्थिक मदत किंवा नौकरी देवून त्यास देशाचा जबाबदार नागरिक बनविणे हे उद्दिष्ट साध्य करणे सरकारने स्विकारले आहे.

## 13. संदर्भ ग्रंथ :-

१. काचोळे. दा. धो. (२०००), भारताच्या विघटनात्मक समस्या, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद

२. कुलकर्णी शिल्पा (२००७) गुन्हा आणि समाज, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

३. पराळकर मु. श. - भारतीय सामाजिक समस्या

४. पाटे सुमन - सामाजिक विघटन व समस्या

५. भांडारकर, भारतीय समाज आणि समस्या एस. चंद्र अॅड कं. लि., रामनगर, नई दिल्ली.

६. माने माणिक- भारतातील समकालीन सा. समस्या

७. लोटे रा. ज.(2007)- भारतातील सा. समस्या, पिंपळापुरे अॅड पब्लिशर्स, नागपूर.

# बाल कामगार - समस्या आणि आव्हाने
## (संदर्भ कळंब तालुका)

**प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड**
समाजशास्त्र विभाग,
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब

**प्रस्तावना :**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारत या देशात कृषी या क्षेत्रावर अवलंबून असणारे बहूसंख्य लोक आहेत. आजच्या भारतात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यापैकी कृषी क्षेत्रातील अधोगती आणि ग्रामीण भागात निर्माण झालेली आर्थिक दरी, यामुळे सामान्य लोकांना वेगवेगळया आव्हानाला तोंड दयावे लागत आहे. तसेच त्याचे पडसाद हे नागरी समुदायावर देखील दिसून येते. त्यामुळे भारतात गरीब आणि आर्थिकदृष्टया मागास असलेल्या समुदायास वेगवेगळया समस्या आणि आव्हानांना सामोरे जावे लागते. प्रामुख्याने या समस्यामुळे बालकांची समस्या निर्माण झाली आहे. म्हणून भारतातील वेगवेगळया अरिष्ठांपैकी बालकांवरील अरिष्ठ किंवा संकट हे फार गंभीर स्वरुपाचे आहेत. भारतात आज बाल कामगार हे बाल मजुरीच्या नावाने औघोगिक क्षेत्र तसेच इतर काही ठिकाणी काम करीत असलेला दिसून येतो. बाल कामगार ही समस्या फक्त भारतातच आहे, असे नाही तर ही समस्या जागतिक असून प्रत्येक देशात वेगवेगळया कारणाने वेगवेगळया काळात निर्माण झालेली आहे, तसेच आजही अस्तित्वात आहे. परंतु भारतासारख्या बलाढय शक्तीशाली देशात बाल कामगारांची संख्या मोठया प्रमाणात असलेले दिसून येते. सरकारी धोरणानुसार वय वर्षे १४ च्या आतील मुलांना कामावर ठेवणे कायदेशीर गुन्हा आहे. असे असतांनाही आज भारतामध्ये कित्येक ठिकाणी बालक हा कुंटुबाची आणि स्वतःची खळगी भरण्यासाठी काम करीत असलेला दिसून येतो.

देश पातळीवर बालकांना मोफत शिक्षण अथवा अन्य सुविधा दिल्यानंतर देखील अर्धवेळ शाळा करणारे आणि शाळा बाहय मुले ही दिवसातून काही वेळ कामाला जातात आणि बहूसंख्य बालक पुर्ण वेळ काम करतात. आज भारतामध्ये दुष्काळासारखे अनेक आव्हाने दर वर्षी येऊ लागली आहेत. त्यामुळे अत्यंत गरीब आणि मागास कुटुंबातील मुले ही जगण्यासाठी का होईना, ते कोठेतरी कामाला जात असलेला दिसून येतो. परंतु त्या ठिकाणी त्या बालकांचे शोषण केल्याशिवाय राहत नाही. म्हणून देश पातळीवर कठोर कार्यवाही करणे गरजेचे आहे.

कळंब या शहरातील काही बाल कामगारांशी सहज मुलाखती घेतल्यानंतर हे स्पष्ट लक्षात येते की, प्रत्येक मुलांची घरची परिस्थिती ही हालाकीची असल्यामुळे तसेच जीवन जगण्यास लागणाऱ्या अपुऱ्या साधनामुळे ते कुठल्याही प्रकारचे काम करण्यास तयार असतात. परंतु काही अपवाद असे आहेत की, घरातील वडिलधारी व्यक्ती व्यसनाधीन असल्यामुळे सुध्दा त्या लहान बालकांना कामावर पाठविले जाते. म्हणून हा शोधनिबंध लिहित असतांना असे म्हणावे लागेल की, आजच्या आधुनिक युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्यने भारत देश हा विकासाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. परंतु आज बाल कामगार या सारख्या समस्याचे निर्मूलन करता आले नाही. त्यामुळे बाल कामगारांना आज वेगवेगळया समस्येला आणि आव्हानाला सतत सामोरे जावे लागत आहे. भारतातील कोणत्याही क्षेत्रामध्ये आज आपणास बाल कामगार पाहावयास मिळेल. या बालकांना अशा शोषणात्मक दमणात्मक संकटातून बाहेर काढून त्यांचा विकास घडवून आणणे गरजेचे आहे.

## संशोधनाचा उद्देश :

१. बालकांच्या समस्या जाणून घेणे.
२. बाल कामगाराची संकल्पना समजून घेणे.
३. बाल कामगारांच्या समस्या आणि आव्हाने यांचा अध्ययन करणे.

## संशोधनाची गृहितके :

१. बाकलांना संरक्षण दिल्यास बाल कामगार ही समस्या कमी होऊ शकते.
२. बाल कामगार हा आर्थिक विवंचनेतून तयार होतो.
३. बालकांच्या समस्या सर्व पातळीवरुन सोडविणे आवश्यक असते.
४. बालकामगारांना न्याय पुर्ण वागणूक दिल्यास त्यांच्या समस्या आणि आव्हाने कमी होऊ शकते.

## तथ्य संकलनाची साधने :

तथ्य संकलनाची साधने म्हणून या शोधनिबंधासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा उपयोग केला आहे. यामध्ये कळंब या शहरातील बालक जे की छोटया-मोठया व्यवसायिकाकडे बाल मजुरी किंवा बाल कामगार म्हणून काम करीत असलेले दिसून येते. या बालकामगारांच्या समस्या जाणून घेण्यासाठी तसेच आजच्या बालकांच्या समस्या आणि त्या बालकापुढील आव्हानात्मक परिस्थिती या संशोधनात्मक विषयांचा अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे. या साठी निरीक्षण पध्दत, मुलाखत, सामूहिक चर्चा, वर्तमानपत्रे, मासिके, संदर्भग्रंथ इ. साधनांचा उपयोग करण्यात आलेला आहे.

## बाल कामगार/बाल मजुरी अर्थ आणि स्वरुप :

गरीबी, बेकारी, लाचारी, दारिद्रय, आकस्मिक संकट, युध्द, भूकंप, महापूर अपघात अशा अनेक कारणांमुळे लोकांवर अचानक संकटे येतात. लोक बेघर होतात, अनेक मुले अनाथ होतात. निराधार झालेली अशी मुले पोट भरण्यासाठी मोलमजुरी करु लागतात व त्यांचे उज्ज्वल भविष्याचे स्वप्न पार धुळीत मिळते. याशिवाय आई-वडील गरीब असल्यास ते मुलांना शाळेत पाठविण्यास समर्थ नसतात. शाळेचा खर्च ते सहन करु शकत नाही. अशावेळेस कुटुंबाला थोडीफार आर्थिक मदत मिळावी म्हणून पालक आपल्या मुलांना वेगवेगळया ठिकाणी कामावर पाठवीत असतात आणि इथूनच बालमजुरीची सुरुवात होते. या विचारातून बालकामगारांची व्याख्या समजून घेणे गरजेचे आहे, ते पुढीलप्रमाणे.

‘‘बालकामगार म्हणजे मानसिक, शारीरिक, सामाजिक, नैतिकदृष्टया धोकादायक व ज्यामुळे शिक्षणात खंड पडेल, किंवा व्यत्यय येत असेल अशा कामामध्ये सहभागी बालक’’

‘‘बालमजुरांमध्ये अपरिपक्व वयात प्रौढासारखे जीवन जगणाऱ्या मुलांचा समावेश होतो. आरोग्याला तसेच मानसिक आणि शारीरिक हानिकारक परिस्थितीमध्ये, तुटपुंज्या वेतनावर त्यांना तासन्तास काम करावे लागते, बऱ्यांच जणांना कुटुंबापासून दूर रहावे लागते. उज्वल भविष्यासाठी अर्थपूर्ण शैक्षणिक संधीपासून बऱ्याच वेळा अशी मुले वंचित राहतात.’’ -- आंतरराष्ट्रीय कामगार संघटना

बालमजुरी निर्मूलन : राज्य कृती आराखडा, महाराष्ट्र शासन २००७ प्रमाणे---

“शाळेत न जाणारी ५ ते १४ वयोगटातील सर्व मुले बालमजुरच असतात. मुलांनी शाळेत नसणे म्हणजे असहय, धोकादायक परिस्थितीत एकूण विकास व वृध्दीला हानीकारक कामात व्यग्र राहण्यासारखेच आहे. त्यामुळे ती बालमजुरीच आहे”

बाल मजुरी किंवा बाल कामगार हा मानवाधिकाराच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. बालकामगार म्हणून ज्या मुलांचा आपण विचार करतो त्याबद्दल सांगायचे झाले तर ५ ते १४ वयोगटातील दिवसाच्या कोणत्याही वेळी कुटुंबात किंवा कुटुबाच्या बाहेर मोबदल्यासाठी किंवा विनामोबदला म्हणून काम करतात त्यांना बाल कामगार किंवा बाल मजूर म्हणतात.

बालकामगार ही समाजातील घातल प्रथा आहे. समाजाजील आर्थिक व सामाजिक व्यवस्थेमुळे बालकांना कष्टप्रद जीवन जगावे लागत आहे. बालकामगार ही संकल्पना बहूआयामी स्वरुपाची आहे. या मध्ये अनेक श्रेणीच्या बालकामगारांचा समावेश होतो. डॉ. वाल्टर फर्नाडीसच्या मताप्रमाणे बालश्रम हे असहाय्य, दुर्गण आहेत किंवा कठोर वास्तवता आहे. ही एक गंभीर सामाजिक समस्या आहे ज्याचा बालकांवर गंभीर दुष्परिणाम होतो. अविकसित, विकसनशील देशात बालक आणि त्यांच्या सेवा हया वस्तू समजल्या जातात, अशी मुले अन्यायाचे बळी ठरतात. दारिद्रय आणि अन्य कारणांमुळे अशा बालकांचे मोठया प्रमाणात मालकांकडून शोषण केले जाते. त्यांना अमानवी वागणूक दिली जाते. लैंगिक शोषण केले जाते. कामाच्या ठिकाणच्या धोकादायक वातावरणामुळे बालकांच्या शारिरीक, भावनात्मक विकासाला धोका पोहोचतो. प्रतिकूल कामाच्या स्थितीमुळे त्यांना आराम मिळत नाही, त्यांची कार्यशक्ती कमी होते, कारण हस्तउघोग, छोटे उघोग व इतर वाणिज्य उघोगात आर्द्रता, अंधार, अपुरा उजेड, त्याचा मुलांच्या वाढीवर, विकासावर आणि आरोग्यावर आत्यंतिक प्रतिकूल दुष्परिणाम होतो.

## बाल कामगार समस्या आणि आव्हाने :

भारतात बालकांच्या समस्या आजच्या आधुनिक युगात आपणास पाहावयास मिळते. भारतातच नव्हे तर बालकांच्या समस्या या कमी अधिक प्रमाणात इतर अन्य देशात ही दिसून येते. साधारणपणे बालकामगार हा संघटीत आणि असंघटीत क्षेत्रात काम करीत असलेला दिसून येतो. बालकामगार हे बांधकाम, हॉटेल, ढाबे, घरकाम, कारखाने, मळा, शेती, मशागत, खाणकाम, वेगवेगळया अवैध व्यवसायातही या बालकांचा वापर केल्या जातो. साधारणपणे असे म्हणता येईल की, बालकामगार हे वेगवेगळया स्तरातून निर्माण होतात. कारण की या बालकांच्या कुटुंबाची एकूण आर्थिक परिस्थिती ही खुपच हालाखीची असल्यामुळे हे बालक आपल्या कुटुंबाला हातभार लावण्यासाठी घर सोडून इतरत्र कोणत्याही ठिकाणी कामाला जातात. म्हणून या बालकांना वेगवेगळया समस्येला तोंड घ्यावे लागते. या समस्येमुळे बालकांना होणारा त्रास फार गंभीर स्वरुपाचे असते. कारण की त्याच्या संपुर्ण आयुष्यातील संधी ही गेलेली असते. मजुरी करणारा बालक आणि त्याच्या समस्या आपल्या नजरेसमोर ठेवल्यास हे स्पष्ट दिसून येते की, यामुळे त्या बालकांचे कुपोषण, त्याची निर्माण होणारी रोगग्रस्त पिढी, कामाच्या ठिकाणी शारिरीक अवयवाचे नुकसान किंवा अवयव गमावणे, अमानवीय वागणूक, अत्याधिक कामाची जबाबदारी, अधिकारांची कमतरता, प्रौढांच्या बेकारीत वाढ, सामाजिक विकास खुंटणे, आत्मविश्वास, आत्मसन्मान व महत्वकांक्षा गमावणे इ. अनेक व्याधींनी तो सामान्य बालक स्वतःच्या विकासापासून खुप दुर गेलेला असतो. कारण की अशा अनेक कारणामुळे त्या बालकांना वेगवेगळया स्वरुपाचे काम करावे लागते. जेव्हा तो समाजात राहतो तेव्हा त्या समाजात खऱ्या अर्थाने सन्मानाची गावणूक मिळेलच याची खात्री नसते. त्या बालकांकडे बघण्याचा मानवी दृष्टिकोन थोडा वेगळाच दिसून येतो. कारण त्याचं अठरा विश्व दारिद्रय आणि कुटुंबाची दयनीय अवस्था या मुळे समाजात त्या व्यक्ती समुहाला वेगळया दृष्टिने पाहिले जाते.

**कार्ल मार्क्सच्या परात्मतेच्या सिध्दांता**वरुन असे म्हणता येईल की, ‘‘श्रमापासून मिळणारे समाधान आणि आनंदापासून दूर जाणे म्हणजेच परात्मता होय. भांडवलशाही उत्पादन पध्दतीमध्ये कामगार केवळ भांडवलदारासाठी श्रम करतो. त्याचा मोबदला त्याला पैशात मिळतो आणि श्रमाच्या आनंदाला तो पारखा होतो. हाच परात्मतेचा अर्थ मार्क्सला अभिप्रेत आहे.’’ आज खरोखरच ही स्थिती निर्माण झालेली आहे. कारण की, पुर्वी कामगाराला त्याच्या कामाबद्दल आनंद आणि समाधान वाटायचा. परंतु आज याच्या विरुध्द आहे, कारण कोणताही कामगार त्याच्या कार्य कुशलतेनी बाजार मुल्य वस्तू निर्माण करतो पण त्याला त्याच्या कार्याची पावती मिळत नाही, मिळते फक्त त्याच्या कामाचा मोबदला. पण त्यांनी निर्माण केलेली वस्तु ही भांडवलदार खुप नफा घेवून विकतो. याचाच अर्थ या ठिकाणी कामगारे शोषण होत असते. अशा शोषणाविरुध्द लढा उभारुन होत असलेले अन्याय थांबविले पाहिजे.

संपुर्ण समाज व्यवस्थेत जाणीव जागृती घडवून आणणे तसेच त्यांना त्यांच्या पाल्याविषयी भविष्यकालीन जीवनातील फायदे सांगून कुटुंब प्रमुखाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. असे केल्यास ही समस्या काही प्रमाणात का होईना, परंतु निश्चितच कमी होता- होता एके दिवशी समुळ नष्ट होऊ शकते. त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

## कळंबमधील बाल कामगारांच्या समस्या आणि आव्हाने :

कळंब हा तालुका उस्मानाबाद जिल्हयातील असून या तालुक्यात इतर तालुक्यापेक्षा बाजारपेठ आणि इतर सोयी सुविधा चांगल्या प्रकारच्या दिसून येते. बालकांना शैक्षणिक सुविधा या ठिकाणी उपलब्ध आहेत. परंतु या तालुक्यात वेगवेगळया जाती जमातीचे लोक राहत असून ते आजही मुख्य प्रवाहात आलेले नाहीत. तसेच ते स्वतः ही स्वतःचे विकास करुन घेण्यास तयार नाहीत. उस्मानाबाद जिल्हयामध्ये प्रामुख्याने पारधी जमातीची लोकसंख्या आहे. त्यापैकी जवळपास लहान-मोठी एकूण ६० वस्ती या जमातीच्या आहेत. पारधी या जमातीचे आजच्या आधुनिक युगातही परिपुर्ण विकास झालेला नाही. हा समाज आजही शिक्षणापासून खुप लांब राहिलेला आहे. तसेच इतर वरिष्ठ समाजाचे त्या समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सुध्दा बदलेला नाही. कारण की, पारधी जमात तसेच इतर काही जमाती हया गुन्हेगारी जमात आहेत. म्हणून या जाती-जमातीकडे पाहण्याचा दृष्टिकोन लोकांचा वेगळाच असतो.

बालकांच्या समस्या आणि आव्हाने हा विषय हाताळत असताना माझ्या समोर अनेक प्रश्न निर्माण झाले. कारण की, साधारणपणे बालकांच्या समस्या या अत्यंत गरीब आणि दैनंदिन जीवन जगण्यास हतबल झालेल्या कुटुंबातील मुलांसमोरच निर्माण होतात. परंतु त्याच बरोबर इतर काही कारण असे आहेत की, कुटुंबातील वडील मंडळी एक तर व्यसनाधीन असते किंवा त्यास जुगार किंवा मटका तसेच पत्ते खेळणे आणि इतर काही कुटुंबातील कलह या मुळे त्या घरामध्ये बालकांचा परिपुर्ण विकास होत नाही. तसेच त्यांना भविष्यकालीन सुविधा दिले जात नाही. त्यामुळे त्या बालकांना वेगवेगळया समस्या आणि आन्हानाला सामोरे लागते.

कळंब शहरातील काही बालकांच्या मुलाखती घेतल्यानंतर त्या बालकांच्या बालकामगार म्हणून पुढे येण्याची कारणे तसेच त्यांच्या कुटंबाची स्थिती या बाबीचा अध्ययन करता आले. आज आपल्या देशात अशाच स्वरुपाच्या समस्या बालकांना सर्वत्र येतात. बालकांच्या संवादातून हे समोर आले की त्यांच्या कुटुंबाची गरीबी, पारंपारिक रोज मजुरी करणारा कुटुंब, शिक्षण घेण्यास आई-वडीलांची असमर्थता, आर्थीक अडचणी, कुटुंबातील सदस्य संख्या जास्त असेल तेव्हा तसेच त्या बालकांना मजुरीला पाठवून कुटुंबला आधार घेणे, काही बालकांना विचारले असता, त्यांनी आपल्या आई-वडीलांचे दोष सांगितले तर काहीनी मात्र वडिल व्यसन करतात. त्यामुळे आम्हाला कामाला पाठविले जाते. अशी प्रतिक्रिया बाल कामगार मुलांनी दिलेली आहे. यावरुन असे म्हणता येईल की , आपल्या देशात

बालकांच्या समस्या खुप आहेत आणि या बालकांना भविष्यात अनेक आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे. परंतु सामाजिक पातळीवरुन जर या बालकांच्या समस्या कडे लक्ष दिले तर यात बदल होऊ शकते. तसेच सरकारच्या माध्यमातून कळंब असतील किंवा इतर शहर असेल या सर्व ठिकाणी बालक आहेत, तसेच त्या बालकांना समस्या देखील आहेत. परंतु त्या बालकांना सरकारच्या माध्यमातून तसेच शासनाचे बालकांच्या कल्याणार्थ उपक्रम राबवून बालकांना समस्या मुक्त करता येते.

समकालीन समाज व्यवस्थेत माणूस जरी बदलत चाललेला असेल, पंरतु समाजातील विषमता मात्र कमी झालेली नाही. गरीब हा गरीबच होत आहे आणि श्रीमंत हा श्रीमंतच होत आहे. म्हणून समानतेसाठी वैचारीक संघर्ष होणे गरजेचे आहे. असे घडून येण्यासाठी त्या सामान्य लोकांमध्ये वैचारिक परिर्तन होणे गरजेचे आहे. असे झाल्यास त्या ठिकाणी समाजवादी विचार निर्माण होईल आणि त्या अत्यंत गरीब आणि मागास कुटुंबातील बालकांना कोणत्याही समस्येला तोंड घ्यावे लागणार नाही. फ्रेंच राज्यक्रांती जर समजून घेतले तर हे लक्षात येते की, अन्यायाविरुध्द सामान्य जनतेनी लढा दिला आणि त्या देशात परिवर्तन घडवून आणले. तसेच भारतात परिवर्तनाची गरज आहे. कारण की, पिढयानंपिढया या देशात गरीब आणि मागास समाजावर अन्याय होत आलेला आहे. म्हणून परिवर्तनासाठी आणि न्याय तसेच हक्काची मागणी करण्यासाठी एकत्र येवून लढा देणे गरजेचे आहे. तेव्हा मात्र या देशातील बालक सुखी आणि भविष्यातील देशाचा आधारस्तंभ म्हणून पुढे येऊ शकतो. त्याकरीता देश पातळीवर बालकांच्या विकासासाठी भरीव कार्य होणे गरजेचे आहे.

## निष्कर्ष :

भारतातील बालकांच्या समस्या आणि आव्हाने हा विषय आजच्या युगातील एक अरिष्ट म्हणून पुढे आलेला आहे. कारण की आपल्या देशात अनेक ठिकाणी कामावर बालक काम करीत असलेला दिसून येते. आज या बालकांचे प्रमाण वाढले असून यावर शासन आणि सरकारी धोरणाची कार्यप्रणाली सक्षमपणे काम करीत नाही. म्हणून हे बालक विकासाच्या प्रक्रियेबाहेर तसेच त्यांना चांगल्या संधी पासून दुर ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. आज ही समस्या जर समूळ नष्ट झाली तर या देशातील मानवी विकास सक्षमपणे प्रगतीशिल दिसून येईल, तसेच त्यामुळे आपल्या देशाची विकास प्रक्रिया सक्षमपणे भविष्यात उभी राहू शकते. कारण की आजचा बालक हा उदयाच्या विकास प्रक्रियेतील केंद्रबिंदू आहे. म्हणून बालकाच्या समस्या आणि आव्हाने समूळ नष्ट व्हावे, त्यासाठी बालकल्याणाच्या दृष्टिने उपक्रम राबवून परिवर्तनाची एक नवी चळवळ उभी करणे गरजेचे आहे.

**राष्ट्रपतीच्या वाढदिवसानिमीत्य**, राष्ट्रपतीच्या हस्ते बालमजुरी प्रतिबंधक मोहिमेस प्रारंभ करण्यात आले आहे. नोबेल पुरस्कार विजेते कैलाश सत्यार्थी यांच्या सत्यार्थी चिल्ड्रन्स फॉउंडेशनच्या वतीने हंड्रेड मिलियन फॉर हंड्रेड मिलियन कॅम्पेन आयोजित करण्यात आले होते. राष्ट्रपतीचे म्हणणे- जगाने विज्ञान-तंत्रज्ञानासह अनेक क्षेत्रांत प्रगती केली आहे. परंतु मानवी पातळीवर बालमजुरी सारखी प्रथा अजुनही पाहायला मिळते, हे दुदैव आहे. मुलांच्या सुरक्षित भविष्यासाठी कोणताही निलंब न करता या क्षेत्रात कार्य करण्याची गरज आहे.

बालकांच्या समस्या हया सार्वत्रिक असल्या तरी, अंतिमतः कोणत्याही समाजातल्या बालकांचा स्तर तिथल्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक दर्जाशी निगडित असतो हे एक मार्गदर्शक तत्व आहे. पण त्याच्या दोन्ही बाजूंना काही विपरीत निरीक्षणे असतात. उदा. उच्चस्तरीय कुटुंबातही कुपोषित बालक असू शकते किंवा तीव्र कुपोषित बालकाच्या कुटुंबातही भरलेली कणगी, तसेच टीव्ही इ. असू शकते. तसेच सामाजिक सुरक्षा म्हणून स्वस्त अन्नधान्य वितरण, आरोगयसेवा, शिक्षण आदी आधार-योजना अतिदुर्बल कुटुंबाना तारुन नेतात. कौटुंबिक आणि सरकारी प्रयत्नांचा सुवर्णमध्य गाठणे महत्वाचे आहे. ते जिथे झाले तिथे तितके यश मिळाले. एकूण महाराष्ट्राच्या बालकांच्या समस्या हया अनेक आहेत.

यापैकी बालमजुरी, कुपोषण अशा समस्या मोठया प्रमाणात आहेत. यावर मात करुन बालकांचे होणारे शोषण कमी केले पाहिजे आणि बालकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणले पाहिजे.

अशाप्रकारे बालकांच्या समस्या आणि आव्हाने असून या घटकाला समस्या मुक्त करण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न केले पाहिजे. राज्य, राष्ट्र पातळीवर बालकांच्या गुणवत्ता विकास उपक्रम राबवून परिवर्तन केले पाहिजे.

**संदर्भ :**

१. आगलावे प्रदिप, (२००७), समाजशास्त्रीय विचारवंत, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
२. इंटरनेट वरील माहिती
३. गायकवाड ज्योती, (१९९६), बालविकास शास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
४. वर्तमानपत्र, मासिके, संशोधनपत्रिका
५. वाणी उमेश,(२०१४), बाल मजुरी आणि कृषी क्षेत्र-एक दृष्टीक्षेप, चिन्मय प्रकाशन, औरगांबाद,

*"Go to the people,*
*Live among them,*
*Learn from them,*
*Love them.*
*Start with what they know*
*Build on what they have"*

**BOOK-POST**

**To,** ______________________

______________________

______________________

______________________




*Printed and Published by Dr.Prakash B. Jadhav, Principal, Manavlok's College of Social Sciences, Ambajogai, Post Box No.23, Ring Road, Ambajogai Dist. Beed, Pin-431517 (MS) at AAI offset, Shop No. 11, Raje Shivchhatrapati Vyapari Sankul, Ambajogai, Dist. Beed.*